

सप्टेंबर १९८८

श्री

# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**

---

**वर्ष ६७ वे** | **किंमत २ रुपये** | **अंक ६ वा**

**दूरध्वनी ४१२२५६१**

---

कार्यालय -

साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/– (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

५९

मन हे लंपट एकवार होतें ।
तेथेंच राहतें गुंतूनीयां ॥
पाण पुण्याईची न राहे जागृती ।
वाढे त्यात गति आणिक हो ॥
म्हणुनी सावध आधींच रहावें ।
मग कुचंबावें लागेना तें ॥
दास म्हणे करा शब्दांचा विचार ।
जोडुनियां कर प्रार्थी तुम्हां ॥

६०

श्री गुरु केवीं यश गाऊं ।
कवण्या नयनिं तुला पाहूं ॥
मंगल नाम कसें घेऊं ।
हृदयी कुठें तुला ठेवूं ॥
न कळे अजुनी कवण्या रीतीं ।
करुं तुझी सेवा ॥
श्री गुरु मार्ग दाविं बरवा ॥ धृ. ॥
असे ती अघटित तव करणी ।
मुखांतिल शब्द वेदवाणी ॥
बिंबवुनि घेती जे प्राणी ।
पावती अक्षय सुखखाणी ॥
न कळे अजुनी कवण्या रीतीं ।
करूं तुझी सेवा ॥
श्री गुरु मार्ग दाविं बरवा ॥
भविं या तारक तूं मजला ।
नाहीं अन्य ध्यास कसला ॥
होतो आनंद जीवाला ।
पाहुनि तव कौतुक लीला ॥
न कळे अजुनी कवण्या रीतीं करुं तुझी सेवा ॥
श्रीगुरु मार्ग दाविं बरवा ॥
जगतीं संत बहू झाले ।
परि ते दृष्टीस नच आले ॥
दासिचें हृदत हें कंबलें ।
म्हणुनी दर्शन नव घडलें ॥
नकळे अजुनी कवण्या रीतीं करुं तुझी सेवा ॥
श्री गुरु मार्ग दाविं बरवा ॥

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला – सप्टेंबर १९८८

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख/कविता शिर्षक | लेखक–कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | – | ४ |
| २ | मी पाहिलेले साईबाबा | – श्री. अ. ज. चितांबर | ६ |
| ३ | लाला लखमीचंदाची स्वप्नपूर्ती | – सौ. उषाताई अधिकारी | ८ |
| ४ | बाबांची धुनी | – श्री. कृ. भा. देशमुख | १२ |
| ५ | साई नाम घेता काय कमी | – श्री. लक्ष्मण सावंत | १४ |
| ६ | संत एकनाथ व त्यांची ग्रंथसंपदा | – श्री. विलास कुळकर्णी | १५ |
| ७ | तेजशलाका | – कु. भारती उथळे | १६ |
| ८ | साईमाऊली | – कु. श्रद्धा संखे | १७ |
| ९ | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | – साईनंद | १८ |
| १० | चरित्र घडण | – श्री. शाम जुवळे | २० |
| ११ | वाणी | – सौ. सुरेखा पवार | २१ |
| १२ | साई आणि भक्त | – ग. दे. कुळकर्णी | २२ |
| १३ | साईदरबारातील माणिक आणि मोती | – साईनंद | २३ |
| १४ | श्री साईंची आरती | – श्री. मिलिंद जोशी | २८ |
| १५ | गणपतीविषयक सामान्य ज्ञान | – श्री. सदानंद चेंदवणकर | २९ |
| १६ | भजन | – श्री एम. टी. सूर्यवंशी | ३० |
| १७ | इति श्री साई उवाच | – श्री. डी. जी. देशपांडे | ३१ |
| १८ | साई चरणी (सु) मन | – सौ. प्रतिभा दमनिया | ३९ |
| १९ | ज्वलंत जागृत शनिदेवाचे देवस्थान | – श्री. म. वि. सामंत | ४० |
| २० | स्वामी स्वरुपानंदांचे शिष्य – स्वामी अमलानंद | – श्री. भालचंद्र गंदे | ४३ |
| २१ | श्री साईबाबा | – श्रीमती शकुंतला खोले | ४७ |
| २२ | साईस्वरूप सद्‌गुरु | – सौ. नीता जाधव | ४८ |
| २३ | साईराम आला | – श्री. मधुसूदन सावंत | ५१ |
| २४ | साईंची अजब लीला..... | – सौ. मंगला वैद्य | ५२ |
| २५ | मनीचा वसा | – श्री. अशोक साळसकर | ५३ |
| २६ | उदी.... एक संजीवनी | – श्री. गुरुनाथ पन्हाळकर | ५४ |
| २७ | परमहंस भालचंद्र महाराज | – श्री. प्रभाकर कुबल | ५६ |
| २८ | साई | – श्री. संजय चव्हाण | ५८ |
| २९ | शिरडी वृत्त | | ६० |

# श्रीसाईनाथ महाराज – ज्ञानाचे प्रचंड भांडार

## संपादकीय



प्रिय श्रीसाईभक्तांनो, आपली आध्यात्मिक प्रगती व्हावी, असे मनापासून वाटत असेल, नव्हे खरोखरीच तशी तळमळ असेल, तर कठोर आत्मपरीक्षणाची नितांत गरज आहे. आपल्यातील दोषांची जाणीव व्हावयास हवी. ते दोष नाहीसे करण्याकडे मनाचा कल व परिश्रम करण्याची आवश्यकता आहे. मानवी मन नेहमी मोहाला शरण जात असते. मोहाच्या दुष्परिणामांचे चटके बसले, तरी त्यापासून परावृत्त होणे जरा कठीणच वाटते. सवयीने थोडे फार बदल घडविणे शक्य असले, तरी उपरतीशिवाय वैराग्य निर्माण होत नाही. उपरतीसुध्दा क्षणैक नसावी. त्याच्यामागे विचारांची बैठक पाहिजे. विवेकाविण वैराग्य पांगळे. मनावर संस्कार झाले पाहिजेत. त्यासाठी सत्संगाची आवश्यकता हवी असते. आपल्या अध्यात्माची पातळी वाढविणारी व्यक्ती मात्र आदर्श असावी व तिने केलेले मार्गदर्शन सुध्दा ग्रहण करावे.

या संबंधात एक सुंदर प्रसंग आठवतो. थोर संत श्री एकनाथ महाराजांकडे एक बाई आपल्या लहान मुलाला घेऊन आली व काकुळतीने महाराजांना म्हणाली, महाराज हा माझा मुलगा गोड फार खातो. गोड खाण्याने त्याला अपाय संभवतो, तरी त्याला त्यापासून परावृत्त करावे. तेव्हा काहीतरी असे करा की, तो गोड खाणे सोडील. महाराज म्हणाले, ठीक आहे. बाई, तुम्ही आठ दिवसानंतर या, म्हणजे सारे ठीक होईल. बाईंना वाटले, ज्याअर्थी महाराजांनी आठ दिवसानंतर बोलाविले आहे, त्याअर्थी महाराज काहीतरी चमत्कार करतील.

आठ दिवसानंतर बाई मुलाला घेऊन महाराजांकडे आल्या. श्रीएकनाथांनी मुलाला आपल्याजवळ घेतले व त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला व म्हणाले, बाळ गोड पदार्थ खाऊ नयेत. त्याने प्रकृती बिघडते, दात खराब होतात, पचन बिघडते इ. इ. नंतर बाईकडे वळून म्हणाले, आता याला घेऊन जा. त्यावर बाई म्हणाल्या, महाराज हे तुम्ही पहिल्याच दिवशी का नाही सांगितलेत? त्यावर महाराज म्हणाले, मी स्वतः गोड खाणे सोडल्याशिवाय त्याला कसे सांगू? मी समर्थ रामदासांच्या सांगण्याप्रमाणे वागतो – **आधी केले मग सांगितले.** एखाद्याला एखाद्या सवयीपासून परावृत्त करणे, किती अवघड आहे, हे मी अनुभवले आणि आता तेच मग त्याला सांगतो आहे. तेव्हा अध्यात्म आपल्या जीवनात पुरेपूर आचरल्याशिवाय दुसऱ्याला उपदेश करू नये, हे नाथांचे तत्वज्ञान आपण प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे.

आज कित्येक बाबाभक्त श्रीसाईमाऊलीपासून अध्यात्म साधना करीत असतील. ज्ञानियांचा राजा योगेश्वर श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, "माझा मऱ्हाठाची बोल कौतुके, अमृतातेही पैजा जिंके". हेच बोल श्रीबाबा अगदी खालच्या थरातील लोकांना ग्रामीण मराठी भाषेत शिकविण्यासाठी पुन्हा शिरडीत अवतीर्ण झाले. कालमानानुसार व देशातील प्रचलित समस्यानुसार बाबा लोकांना ज्ञान देत होते. पण ते साचेबंद नव्हते. श्री ज्ञानेश्वरांनी अध्यात्मिक ज्ञान वाङ्मयनिर्मिती करून दिले, तर श्री साईनाथांनी वेगवेगळ्या स्तरावर तसतशा अडाणी, अशिक्षित लोकांनासुध्दा अध्यात्म शिकविले. श्रीबाबा त्याकाळी प्रत्येकाची अधिकारस्थिती ग्रहणशक्ती विचारात घेऊन ज्ञान प्रदान करीत. श्रीदेव मामलेदारांना ज्ञानेश्वरी त्यांनीच समजावली, नाना चांदोरकरांना गीतेचा अर्थ त्यांनीच सांगितला. आपले आवडते भक्त श्रीदासगणू महाराजांना ईशावास्य भावार्थ बोधिनी लिहित असता न समजलेल्या एका प्रमेयाची उकल मोलकरणीच्या मुखातून केली. याप्रसंगी ज्ञानेश्वर माऊली रेड्यामुखी वेद वदविल्याची आठवण होते.

असो. भक्तांनो, श्रीसाईनाथांकडे ज्ञानाचे भरपूर भांडार आहे. आपल्या साईसत्‌चरिताच्या ३२ व्या अध्यायात ते म्हणतात-

**उतून चालिला आहे खजिना, एकही कोणी गाड्या आणीना**
**खणा म्हणता कोणीही खणीना, प्रयत्न कोणा करवेना ॥१६२॥**
**मी म्हणतो पैका खणावा॥ गाड्यावार लुटून न्यावा॥**
**खऱ्या माईचा पूत असावा, तेणेंच भरावा भांडार ॥१६३॥**

तेव्हा असा हा ज्ञानाचा, अध्यात्माचा खजिना व भक्तीची लयंलूट करावयाची असेल, तर शिरडी हे श्रीबाबांचे ज्ञानपीठ आहे. तेव्हा भक्तांनो, त्यांच्या चरणांजवळ स्थिर व्हा. श्रीसाईनाथ महाराज सद्‌गुरूच्या भूमिकेत म्हणतात, गुरूकडे कसे पहावे - पहा अध्याय ३२ –

**– गुरू एक दृष्टीचे ध्यान। इतर सर्व गुरू समान॥**
नाही गुरूविण दुजें आन। अनन्य अवधान याना ॥८१॥

– जय श्रीसाईराम

माझ्या आठवणीतून

# मी पाहिलेले श्रीसाईनाथ महाराज – ९

– श्री. अ. ज. चितांबर
– जी. डी. सी अँड ए.
गीताभ्यास कार्यालय,
घर क्रमांक २०४,
दिल्ली दरवाजाजवळ,
मु. पो. अहमदनगर - ४१४००१.



**(श्री. अनंत जयदेव चितांबर महाराष्ट्रातील एक थोर संस्कृत विषयाचे विद्वान म्हणून ओळखले जातात. गीतेवर त्यांनी लिहिलेले पुस्तक प्रसिध्द आहे. श्री बाबांचा निकट सहवास बाल अनंतरावांना अनेक वर्षे लाभला. त्याबद्दल ते स्वतःला धन्य समजतात. बाबांच्या अचाट ज्ञान सामर्थ्याने आपण संस्कृतचे सखोल अध्ययन केले. केवळ श्रींच्या प्रभावामुळेच आपण आतापर्यंत तरून गेलो, असे तेसांगतात. सुविद्य अनंतरावांनी श्रीसाईलीलातून यापूर्वी भरपूर लेखन केले असून श्रीसाईलीला तृतीय लेखक कवी संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले आहे. सुविद्य अनंतरावांना यंदा १७ सप्टेंबर रोजी ७८ वर्षे पूर्ण होत असून ते ७९ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. आम्ही त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतितो. - का. संपादक)**

कोणते पुण्य मागील जन्मी केले होते, ते समजत नाही. पण ह्याजन्मी प्रत्यक्ष दत्तावतार श्रीसाईबाबांचे दर्शन झाले. त्यांच्या पदकमलांवर मस्तक ठेवून त्यांचे दररोज दर्शन घेतले. 'अल्ला अच्छा करेगा' हा त्यांच्या शब्दातील आशीर्वाद घेतला.

प्रत्यक्ष परमेश्वर सगुण रूपात कसा अवतरतो व भक्तांचे मनोरथ पूर्ण करतो, हे समक्ष पाहिले आहे. त्यामुळे 'धन्योहम्' हेच उद्‌गार निघतात.

माझा जन्म नेवासे येथील चांदे या गावी झाला. मी सव्वा वर्षांचा असताना माझ्या वडिलांची बदली शिर्डी येथे झाली. माझे वडील तेथील मराठी शाळेचे हेडमास्तर होते. त्यांची अढळ निष्ठा श्रीसाईबाबांवर होती व 'श्री साईबाबा हे प्रत्यक्ष परमेश्वर आहेत' हा त्यांचा अनुभव त्यांनी आम्हास सांगितला.

श्रीसाईबाबा कोठून आले, त्यांचे गाव वगैरे काहीही माहिती कोणास होऊ शकली नाही. प्रथम खंडोबाचे पूजाऱ्यास (हे देऊळ गावाबाहेर आहे) त्यांचे दर्शन झाले व त्यांनी बाबांना 'या साई' असे संबोधले व 'साईनाथ' हेच नाव बाबांना मिळाले.

श्रीसाईबाबांचा मुक्काम शिर्डी येथील गावातील मशिदीत झाला. या मशिदीस 'द्वारकामाई' असे नाव पडले.

"यवनस्वरूपी एक्या दर्शन त्वां दिधले, संशय निरसुनियां तद्वैता घालविले" हे बाबांच्या दररोज होत असलेल्या आरतीतील वर्णन बाबांना लागू पडते. सर्व धर्मांचे लोक बाबांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेत असत.

श्रीसाईबाबांनी १९१८ साली देह ठेवला. त्यावेळी मी ८ वर्षांचा होतो. बाबांच दिनचर्या मी दररोज पाहात होतो. बाबा शिर्डी सोडून कुठेच गेले नाहीत. पण त्यां ठिकठिकाणचे भक्त शिर्डीस येऊन त्यांचे दर्शन घेत होते.

मशिदीत बाबांनी धुनी अग्नीकुंड केले. त्यातील उदी ते प्रसाद म्हणून भक्तांस देत असत. 'उदीचे' चमत्कार हे सर्व भक्तांना अवगत आहेत.

बाबांच्या मशिदीत एका दरवेशाने वाघाचा खेळ बाबांना करून दाखविला, त्यावेळी मी प्रत्यक्ष मशिदीत होतो. आश्चर्य हे की, बाबांचे दर्शन घेण्यास, पायरीवर डोके ठेवण्यास तेथील पाटील यांनी दरवेशास सांगितले. त्याप्रमाणे वाघाने पायरीवर दर्शनासाठी एखाद्या माणसासारखे डोके ठेवले. तो काय, वाघ गतप्राण झाला. बाबांनी त्या वाघास मुक्त केले. पुराणात आम्ही गोष्टी वाचतो, पण... पण हा चमत्कार समक्ष पाहण्याचे भाग्य मला व इतर भक्तांना मिळाले. ह्या वाघाचा देह महादेवाच्या देवळासमोर पुरण्यात आला.

बाबांनी देह ठेवल्यावर त्यांची मिरवणूक मुसलमान पध्दतीने निघून त्यांचा देह नागपूरचे बुटी यांनी बांधलेल्या वाड्यात (समाधी मंदिरात) ठेवण्यात आला. बाबा असताना होत असलेल्या आरत्या, पूजा हे नित्यनियमित होत आहे. श्री बुटी हे देवळात कृष्णाची मूर्ती स्थापन करणार होते. पण बाबांनी मीच श्रीकृष्ण आहे, असा अनुभव त्यांना दिला.

रामनवमी, श्रीकृष्णाष्टमी, श्रीदत्तजयंती, गुरूपौर्णिमा इत्यादि उत्सव शिर्डीत श्रीसाईबाबांच्या समोर होत असतात.

श्रीउपासनी महाराजांनी बाबांचे प्रार्थना अष्टक केले आहे. त्यात 'अजन्माद्यमेकम् परब्रहम साक्षात् स्वयंसंभवम् रामदेव अवंतीर्णम्' असे वर्णन बाबांचे केलेले आहे. तेव्हा

श्रीसाईनंद हे श्रीदत्त, श्रीराम, श्रीकृष्ण आहेत. त्यांचे वर्णन कितीही केले तरी अपूर्णच राहणार.

तेव्हा 'कृष्णनाथा दत्ता साई, जडो चित्त तुझे पायीं'.

# लाला लखमीचंदाची स्वप्नपूर्ती

**– सौ. उषाताई अधिकारी**
सावित्रीसदन, बंदर रोड, रत्नागिरी.

श्रीबाबांना एखाद्या व्यक्तीचे शिरडीस आगमन व्हावे, असे वाटले की, आधी ते त्याच्या स्वप्नात जाऊन दृष्टांत देत. नंतर दर्शनाची उत्कंठा त्याच्यात निर्माण करून स्वतःच शिरडीत येण्यास त्याला उद्युक्त करीत. राली नावाचे ग्रीक बंधू व्यापारी होते. त्यांच्या सर्व हिंदुस्थानभर पेढ्या होत्या. मुंबई शहरातही एक पेढी होती. त्या पेढीत पुष्कळ वरिष्ठ अधिकारी होते. त्यांच्या हाताखाली लाला लखमीचंद नावाचा अतिशय विश्वासू, प्रामाणिक व कामसू माणूस कामावर होता. आरंभी त्याने रेल्वे खात्यात नोकरी केली होती व नंतर व्यंकटेश मुद्रणालयात तो नोकरीला होता. ह्या मुद्रणालयात नोकरीला असतानाच त्याचे भाग्य उदयाला येऊन श्रीसाईसमागमाचा योग जुळून आला. लालाजी सांताक्रुझ गावी असताना त्याला स्वप्न पडले. स्वप्नात अवतीभवती भक्तांचा गोतावळा बसला असून त्यांच्याबरोबर हास्यविनोद करण्यात रंगून गेलेला एक साधू त्याला दिसला. त्या साधूच्या चेहऱ्यावर इतके विलक्षण तेज होते आणि त्याचे रूपडे इतके मोहक होते की, भान विसरून लालाजी त्याच्याकडे बघतच राहिला. आपल्या हृदयात त्या साधूबद्दल विलक्षण प्रेम दाटून येत आहे, असे त्याला वाटले. नकळत हात जोडले गेले. पुढे पाऊल टाकावे म्हणून तो उठतोय, तो जागा होऊन आपण सारे स्वप्नच पाहिले, हे त्याच्या लक्षात आले. पण स्वप्नातल्या त्या विलक्षण साधूचा त्याला विसर पडेना. जीवाची घालमेल सुरू झाली. त्या साधूचे सुखदायक दर्शन परत कधी होईल, म्हणून लालाजी वाट पाहू लागला. पुन्हा त्याचे भाग्य फळफळले. त्यावेळी दासगणू महाराज श्रीबाबांविषयी कीर्तने करीत सबंध महाराष्ट्रभर हिंडत असत. यावेळी त्यांची फेरी नेमकी मुंबईला झाली. लालाजींचे स्नेही दत्तात्रय मंजूनाथ बिजूर हे परम साईभक्त होते. त्यांना कीर्तनासंबंधी समजताच ते लालाजीला बरोबर घेऊन कीर्तनाला गेले. कीर्तनाला सुरूवात झाली. दासगणूंनी तुकाराम महाराजांचे आख्यान लावले होते. दासगणूंचे सुश्राव्य कीर्तन, त्यात

तुकारामांचे आख्यान आणि समोर साईबाबांच्या छबीचे दर्शन. स्वप्नातला साधू तो हाच आणि तो दासगणूंसारख्या सत्पुरूषाचा गुरू असला पाहिजे, हे लालाजीने ओळखले. तो परत परत त्या छबीकडे पाहू लागला. त्याला गहिवर येऊन डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. अशा साधूचे, थोर महात्म्याचे दर्शन आपल्याला प्रत्यक्षात कधी होईल, अशी तीव्र उत्कंठा निर्माण झाली. शिरडी गावी हे साधू असतात, ते शिरडी गाव कुठे आहे, तेथे आपणाला नेणारा एखादा स्नेही भेटेल का, त्याचा सहवास लाभेल का, या साधूचे मंगलदायक दर्शन आपणाला होईल का, या विचाराने लालाजी बेचैन झाला. एकसारख्या त्याच विचारांनी काहीतरी खर्चाची सोय लावून शिरडीस प्रयाण करायचेच, असा त्याने निश्चय केला, तोच रात्री आठ वाजता त्याचा एक स्नेही दार ठोठावू लागला. लालाजीने लगबगीने दार उघडले, तो त्याचा परमस्नेही शंकरराव सस्मित मुद्रेने उभा. तो म्हणाला, "लाला, शिरडीस येतोस का? अरे, मी खरं म्हणजे केडगावच्या नारायण महाराजांच्या दर्शनाला जाणार होतो, पण काय झाले कुणास ठाऊक! मला शिरडीलाच जायची प्रेरणा झाली आहे. तेव्हा तूही चल, येतोस ना?" मित्राचे हे अमृतमय बोल ऐकून लालाजीला स्वर्ग केवळ दोन बोटे उरला. हर्षातिरेकाने तो म्हणाला, "अरे, येतो म्हणजे काय, येतोच. अरे, मी ज्यासाठी वेडापिसा झालो होतो, ते काहीही कष्ट न होता आपणहून घरी चालत आले आहे. त्याचा अव्हेर कोण करील? येतो मी. तू तयारी कर. मीही करतो. उद्याच निघू." शंकररावाला मित्राचे बोलणे ऐकून संतोष झाला. मोठ्या आनंदाने तो घरी गेला. लालाजीने दुसऱ्या दिवशी आपल्या चुलत भावाकडून १५ रूपये उसने घेतले. वळकटी बांधली व मित्राबरोबर स्टेशनवर गेला. विनासायास तिकिटे मिळाली व गाडीत बसायला जागा मिळाली. हे जे सगळे घडत आहे, ते केवळ आपले परमेश्वर, सद्गुरू साईबाबांमुळे, हे लालाजी मनोमन समजला. पुढे गाडीत शंकरराव व लालाजी यांनी भजन केले. काही वेळाने डब्यातला सहप्रवाशांकडे श्रीबाबांविषयी चौकशी केली. तेव्हा नगर जिल्ह्यातल्याच चार मुसलमानांनी म्हटले, 'अहो, आमच्या अहमदनगर जिल्ह्यात शिरडी ग्रामी साईबाबा म्हणून महान संत आहेत. अनेक वर्षे ते तिथे वास्तव्य करून आहेत. त्यांचे भक्तप्रेम, त्यांची अफाट, अगाध शक्ती यांचे वर्णन काय करावे? खरोखर शिरडीतल्या लोकांचे पूर्वजन्मीचे पुण्य म्हणून बाबा तिथे आले आणि कायमचे शिरडीकर झाले. आता तर तिथे यात्रेसारखी माणसं जमतायत.आपूण तिकडेच चाललायत ना? जरूर जा. त्यांच्या कृपेने तुमच्या जन्माचे कल्याण होईल." हे बोलणे ऐकून दोघे आनंदले. मनोमन बाबांच्या छबीचे ध्यान करीत दोघे कोपरगावला उतरले. त्याचवेळी श्रीबाबांना पेरू फार प्रिय आहेत, याची लालाजीला आठवण झाली. परंतु टांग्याने जाताना गोदावरी काठचा रम्य देखावा बघण्यात ते पेरूंची गोष्ट विसरले. आता चार गाव टाकली की शिरडी आलीच. शिरडी जवळ आली, हे लक्षात येताच लालाजीला पुन्हा पेरूंची आठवण झाली. इतक्यात एक म्हातारी डोक्यावर पाटी घेऊन टांग्यामागे धावताना दिसली, तेव्हा त्यांनी टांगा

थांबवला. पहातात तो तिच्याजवळ पेरूच होते. त्यातले काही पेरू निवडून त्यांनी विकत घेतले. तेव्हा म्हातारी म्हणाली, "तुम्ही बाबांसाठी पेरू घेतलेत नां? हे उरलेत ते माझे म्हणून बाबांना अर्पण करा." तिची भक्ती पाहून दोघांनाही आश्चर्य वाटले. आपल्याला जो स्वप्नात दिसला, नंतर छबीरूपाने कीर्तनात दिसला, त्याचीचं ही म्हातारी कुणी नसेल ना, असे विचार लालाजींच्या मनात येऊन गेले. पुढे ते शिरडीच्या सीमेवर आले. समोरच दोन निशाणे दिसली. त्यांना वंदन करून ते मशिदीत आले. पूजेचे साहित्य बाजूला ठेवून ते आनंद निर्भर मनाने श्रीबाबांकडे एकटक पाहू लागले. त्यांचे अंग अंग मोहरून आले. कंठ गहिवरून आला. तहानभूक विसरून त्यांनी बाबांचे पाय धुतले. अष्टोपचार पूजा केली. केळी, नारळ, पेरू अर्पण केले. धूप-दीप लावले. विडा अर्पण केला. दक्षिणा दिली आणि हार अर्पण करून मनानेच प्रदक्षिणा घातली व साष्टांग नमस्कार केला. आणि श्रीबाबांचे उजवे बाजूस शांतपणे बसले, तेव्हा श्रीबाबा म्हणाले, "साले रस्ताभर भजन करीत आले. इथली खबरबात दुसऱ्यांना विचारत आले. इतरांना विचारायची जरूरच काय? प्रत्यक्ष येऊन आपल्या डोळ्यांनी समक्ष पाहून खरे का खोटे, ते ठरवावे. मारवाड्याकडचे पैसे उसने घेऊन येण्याची काय गरज होती? असो. आतातरी हौस फिटली ना?" हे बोलणे ऐकून, आपण गाडीत भजन केले, खरोखरच पैशांचा तोटा असताना उसने पैसे घेतले, बाबांची हरप्रकारे चौकशी केली, हे बाबांना कसे कळले, याचे आश्चर्य वाटले. ऋण काढून यात्रा करणे, श्रीबाबांना पसंत नाही, हेही अनुभवास आले.

पुढे ते सर्व साईभक्तांसह साठ्यांचे वाड्यात जाऊन मोठ्या समाधानी वृत्तीने जेवायला बसले. इतक्यात कोणा भक्ताने श्रीबाबांचा प्रसाद म्हणून थोडथोडा सांजा प्रत्येकाच्या पानावर वाटला. तो लालाजीला फार आवडला. दुसऱ्या दिवशी जेवायच्या वेळी नेमकी सांज्याचीच आठवण त्याला झाली, पण तो काही नित्याचा नसेल, या विचाराने तो गप्प राहिला. त्याच्या मनातली सांज्याची आवड श्रीबाबांना अंतर्ज्ञानाने कळली होतीच. दुसऱ्या दिवशी बापूसाहेब जोगांनी आज नैवेद्याला काय आणू, म्हणून विचारताच ताटभर सांजा ताबडतोब घेऊन यायला सांगितले. तेव्हा पूजासाहित्य तिथेच ठेवून बापूसाहेब घरी गेले व सर्वांना पुरून उरेल, इतका सांजा घेऊन आले. पुढे पूजाअर्चा होऊन दुपारची आरती झाली. नैवेद्याची ताटे येऊ लागली. तेव्हा बाबा म्हणाले, 'आजचा दिवस फार चांगला आहे. आज सर्वांसाठी सांजाच लवकर घेऊन या." मग भक्तांनी दोन बगोणी भरून सांजा आणला. लाला लखमीचंदाला भूकही लागली होती आणि त्याच्या पाठीतही फार दुखत होते, त्यामुळे तो अगदी अस्वस्थ झाला होता. त्याची ही स्थिती इतरांना नाही, पण श्रीबाबांना कळली होती. ते म्हणाले, "काय करावे. भूक फार लागली आहे आणि पाठही फार दुखत आहे. सांजा खाऊन घेऊ या. बघावं काय होतं ते!" लाला लखमीचंदाचे मन गहिवरून आले. महाराज पूर्ण अंतर्ज्ञानी आणि दयाळू आहेत, ही त्याची खात्री पटली. खरोखरच भरपूर सांजा खायला मिळताच तो अगदी तृप्त झाला व त्याची पाठदुखीही तेव्हापासून बंद झाली.

त्याच खेपेस रात्री चावडी समारंभ पहाण्यासाठी तो गेला असता, श्रीबाबांना खोकला लागून त्याचा विलक्षण त्रास होऊ लागला, तेव्हा भाबडा लखमीचंद म्हणाला, "काय हा खोकला! किती त्रास देतोय तो बाबांना! नक्कीच कुणा दुष्टाची वाईट नजर श्रीबाबांना लागली असेल. माझे बाबा, माझे दैवत खरोखरच दृष्ट लागण्यासारखेच आहेत. दुसऱ्या दिवशी लालाजी मशिदीत येताच श्रीबाबा शामराव देशपांड्यांना म्हणाले, "अरे श्यामा, मला नक्कीच कुणाची तरी दृष्ट लागली आहे. पहा हा खोकला मला किती बेजार करीत आहे!" हे बाबांचे बोलणे ऐकून लालाजीची मति गुंग झाली. त्याने धावत जाऊन श्रीबाबांचे पाय धरले आणि म्हटले, "बाबा, आपल्या दर्शनाने आणि कृपेने मी अतिशय आनंदित झालो आहे. अशीच कृपा मजवर ठेवा. या पायावाचून मला अन्य काही प्रिय नाही. माझे मन सदा आपल्या भजनात रंगू दे. ध्यानी, मनी, स्वप्नी आपले चरणच मला दिसू देत. संसारात सदा आनंदीआनंद असू दे. मन कधीही कष्टी नसू दे. आपले नित्य स्मरण असू दे. हाच मला आशीर्वाद द्या. दुसरे काही मागायचे नाही. आपल्या दर्शनाची व सहवासाची माझी इच्छा पूर्ण झाली, यात सगळे काही भरून पावले." विनम्र लखमीचंदाच्या मस्तकावर श्रीबाबांनी आपला अभयहस्त ठेवून त्याचे मस्तक प्रेमाने थोपटले, तेव्हा असंख्य चांदण्यात आपण न्हाऊन निघत आहोत,असेच त्याला वाटले. श्रीबाबांच्या पायावर पुन्हा लोळण घेऊन, उदी व आशीर्वादासह तो आपल्या घरी परतला. तेव्हापासून शिरडीत कुणीही जावो, त्याच्याबरोबर हार, दक्षिणा, कापूर, उदबत्ती पाठविण्याचा नियम स्वतःला लावून घेतला आणि अखेरपर्यंत तो पाळला.

धन्य तो लाला लखमीचंद आणि धन्य ते लाड पुरविणारे बाबा!

# अलौकिक अमृतमय 'पसायदान'

ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायाचे शेवटी ओवी क्र. १७९३ ते १८०१ या नऊ ओव्या म्हणजेच श्रीज्ञानदेवांनी देवाजवळ सर्वसमाजासाठी, सर्व प्राणिमात्रांसाठी मागितलेले मागणे आहे. तेच अलौकिक 'पसायदान' होय. या अमृतमय ओव्यामध्ये किती गर्भितार्थ भरलेला आहे त्यांचे विश्लेषण श्री. दिवाकर घैसास यांनी बहुजन समाजासाठी फारच सोप्या भाषेत सादर केले आहे. शालेय विद्यार्थ्यांना व साधकांना हे सारखेच उपयुक्त आहे. दिवाकरांचे अभंगरुप पसायदानही प्रासादीक आहे. पसायदानरुपी ही प्रार्थना आपण म्हणतो तिचा अर्थ व रहस्य जाणून घेऊन ती म्हटल्यास मनाला खूपच समाधान वाटेल.

हे 'पसायदान' ३२ पृष्ठांचे असून टाईप जरा मोठा वापरला आहे. मुखपृष्ठावर श्री ज्ञानदेवांचे मनोहर असे संगीत दर्शन आहे. प्रत्येक घरात हे छोटे पण बहुगुणी पुस्तक हवेच हे काय सांगावयास हवे!

निरुपण : दिवाकर अनंत घैसास, पृष्ठे ३२, मूल्य ३ रुपये. प्रकाशक : माधव त्रिंबक परचुरे. बलवंत पुस्तक भांडार, गिरगांव, मुंबई-४.

# बाबांची धुनी

— श्री. कृ. भा. देशमुख
तिर्थ (ब) को. हौ. सोसायटी, रामबाग कॉलनी,
ब्लॉक नं. १, तळमजला, पौड रोड,
श्रीमान हॉटेलासमोर, पुणे ४११०३८

चांद पाटलाच्या घरी बाबा राहिल्यामुळे लोक फार आनंदित होते. प्रत्येक जण आपली दु:खं बाबांना सांगून त्यातून मुक्त होत होता व आनंदाने घरी परतत होता. पाच दिवस धूप गाव आनंदात होता. पाच दिवस कसे गेले हे लोकांना कळलेही नाही. आज मात्र सारा गाव खिन्न दिसत होता, कारण बाबा उद्या जाणार होते. चांद पाटलाच्या भाच्याची सोयरिक शिरडीला ठरली होती आणि लग्नाचे वऱ्हाड सुध्दा आज निघण्यास तयार झाले होते. चांद पाटलांनी बाबांना विचारले, "मालिक, उद्या शादीची वरात शिरडीला जाणार आहे. आपण येणार ना? "हां हां क्यों नहीं. शिरडी मेराही स्थान, माझ्या गुरूरायाचं स्थान. मी जरूर येणार व तिथेच राहणार".
"तिथेच राहणार," चांदभाईने काकुळतीने विचारले.
"अरे, मी तिथेही आहे व इथेही आहे." बाबा म्हणाले.
"लेकिन आप तो जा रहे हैं" चांदभाई म्हणाला.
"होय रे, मला गेलेच पाहिजे, अल्लामियाची इच्छा है" बाबा म्हणाले. सर्वांना वाईट वाटले, पण अधिक बोलण्याची कुणाची हिंमत नव्हती.

आज पहाटे सारा गाव चांदभाईच्या घराकडे लोटत होता.. लहान थोर सर्वच. रात्रभर लोक जागे होते. बैलगाड्या जोडल्या गेल्या. सामान भरलं गेलं. वऱ्हाड स्थानापन्न झालं. सर्व तयारी झाल्यावर चांद पाटील फकिराला घेऊन बाहेर आला. सर्वांनी जयघोष केला, "फकिर बाबा की जय". भराभर बाबांच्या पायावर डोके ठेवून लोक दर्शन घेऊ लागले. काही लोकांनी प्रेमाने हार करून आणले होते. बाबांनी हार स्वीकारले नाहीत. लोकांनी ते बाबांच्या गाडीला घातले. बाबा गाडीजवळ आले. त्यांनी हार बैलाच्या गळ्यात घातले. नंदी बैलांची जोडी तयार झाली. शंभू महादेवापुढे दोन नंदी. गाडीत चढण्यापूर्वी बाबांनी सर्वांना हात जोडून नमस्कार केला व गहिवरून म्हणाले, "बाबांनो मला विसरू नका". लोकांनी जयघोष केला, "नाही". बाबा गाडीत चढून बसले. पुन्हा बाबांचा जयघोष झाला. गाड्या हलल्या. सर्वांच्या पुढे होती बाबांची गाडी. दुसऱ्या दिवसाचा सुर्योदय झाला. रविराजाची पहिली किरणे बाबांच्या गाडीवर पडली. दिवस रात्र प्रवासामुळे गाडीतले प्रवासी थकले होते व पेंगत होते. बाबांच्या चेहऱ्यावर मात्र तजेला होता. आता शिरडी गाव दिसू लागलं. गावाबाहेरच्या खंडेरावाच्या देवळातील आरतीचे सूर ऐकू येऊ लागले "जयदेव जयदेव जय खंडेराया आरती घ्यावी माझी जेजुरीच्या देवा". शिरडीतील शेतकरी शेतावर जाण्याच्या तयारीत होते. पक्षीगण आपल्या घरट्यातून बाहेर पडत होते. झाडावर

बसून किलबिल करून ते आरतीला साथ देत होते. नुरभाईच्या घरी मांगल्याची शहनाई वाजत होती. त्याच्या मुलीची शादी चांद पाटलाच्या भाच्याशी ठरली होती. शिरडी गावातलं लगीन म्हटलं की, सारा गाव एक होऊन ते कार्य पार पाडीत असे.

शिरडी हिंदु मुस्लिम एकीचं प्रतीक होतं. या गावात धर्म वेगळे पण मन एक होतं. नुरभाई पाहुण्याच्या स्वागतासाठी खंडेरायाच्या देवळापाशी येऊन उभा होता. वटवृक्षाच्या गर्द झाडीत लपलेले हे देऊळ अधिक रम्य दिसत होतं. खंडेरायाचे पुजारी म्हाळसापति यांचा उजवा डोळा आज फडफडत होता. ते शुभचिन्ह होते, त्यामुळे ते आनंदी होते. खंडेरायाची आरती संपवून ते बाहेर आले. त्यांनी समोर पाहिले. चार वर्षापूर्वी अदृष्य झालेला तरूण योगी फकिराच्या वेषात पहिल्याच गाडीतून उतरत होता. म्हाळसापति व त्याची नजरानजर झाली. हातातील आरती खालती ठेवून म्हाळसापति पुढे धावले "आवो साई, साईबाबा" म्हणत त्यांनी फकिराला साष्टांग नमस्कार घातला व ते बाजूला झाले. साईबाबा आणि आईबाबा किती विलक्षण साम्य या दोन शब्दांत. साऱ्या जगातील मूर्तिमंत वात्सल्याचे प्रतीक. फकिराला या नावाने संबोधून म्हाळसापति बाजूला झाले. फकिराला तेच हवे होते. तो मंदिराकडे वळून म्हणाला, चला आता तुझ्या विठ्ठल मंदिरात.

"मंदिरात" म्हाळसापति घाबरून म्हणाले.

मग बोलवलंस कशाला, आवो साई म्हणून? फकिराने आवाज चढवला. चांद नूर सर्व घाबरले. हिंदुंच्या मंदिरात मुसलमान फकिर शिरला तर गावात अनर्थ होईल. गुण्यागोविंदाने रहाणाऱ्या या गावाची शांती लोकांना टिकवावयाची होती.

पण बाबा, लोक काय म्हणतील? मुसलमान हिंदुंच्या देवळात, म्हाळसापति धीर धरून बोलले. "मुसलमान" बाबा चिडले.

ते नूरला म्हणाले, "काय रे नूर, तुझ्या अल्लाची जात कुठली?"

नूर गडबडला, त्याला उत्तर देता येईना.

"बोल भगत, तुझ्या विठोबाची जात कुठली?" फकीर कडाडला. कशी सांगशील तू. ईश्वराला जात नाही, माणसाला कशाला हवी? ठीक आहे मशिदीत जातो मी.

पण शादीघर पर नहीं आएंगे आप? नूर आदरपूर्वक म्हणाला.

"नहीं. चुकला फकिराला मशिदच बरी. याद राख भगत, तेरी मसजिद का मंदिर होगा. तुझ्या कृष्णाचे मंदिर "द्वारकामाई" आणि सर्व हिंदु मुसलमान तेथे लोटांगण घालतील."

बाबा भराभर पावले उचलीत मशिदीकडे निघाले. गावकरीही त्यांच्या मागे साईबाबा, साईबाबा करीत निघाले. बाबा मशिदीत घुसले अन् तावातावानं आतल्या कोठ्याकडे वळले. आत सर्वत्र घाण पसरली होती. पडझड झालेली ही गावातील जुनी मशिद सोडून दिलेली, कुणी जात नव्हतं तिथे. बाबांची चाहूल लागताच दोन तीन घुशी धावत सुटल्या व तिथल्याच बिळात घुसल्या. दुसऱ्या एका बिळातून डोके बाहेर काढणाऱ्या सापाने आत दडी मारली. बाबा वर गेले आणि एका ओंडक्यावर

बसले. गावकरी गोळा झाले. गावकऱ्यांनी त्यांना गावातील नव्या मशिदीत चलण्याची विनंती केली. ती बाबांनी धुडकावली. मंडळींनी तेथेच साफसफाई करण्यास सुरूवात केली. बाबांनी चिलिम काढली आणि तंबाखू भरण्यास सुरूवात केली. चांदने धावत जाऊन पाणी आणले आणि बाबांचे चिलिमीचे फडके त्यात भिजवले. बाबा उठून उभे राहिले आणि सटका उचलून त्यांनी त्याच ओंडक्यावर हाणला. ते जुनाट लाकूड क्षणार्धात पेटले. चिलिम पेटली, झुरके सुरू झाले. बाबांचे विचारचक्र सुरू झाले. ते कुणाशीच बोलले नाहीत. निमिषार्धात घडलेल्या या घटनेने भारावलेल्या गावकऱ्यांनी निर्णय घेतला आणि जळत असलेल्या त्या ओंडक्याचा अग्नी कायम जळत ठेवण्याचे त्यांनी ठरविले. भराभर लाकडं आली व त्या अग्नीत पडली. मशिदीत अग्नी कायमचा जळू लागला. त्याचे नाव पडले बाबांची धुनी. असा आहे इतिहास बाबांच्या धुनीचा. आजही ती द्वारकामाईत धगधगत आहे व हजारो भाविकांचे दु:ख निवारण करीत आहे.

*******

## ॥ साई नाम घेता काय कमी ॥

सुखदु:खाने भरलेल्या मानवी जीवनात।
साई तूच एकचि आधार या संसारात ॥
साईनाथ जीव माझा तोचि माझा मायतात।
साई नाम घेता काय कमी मला जीवनात ॥ १॥
साई माझा देव साई माझा गुरूदेव दत्त।
साई माझे तीर्थक्षेत्र साई माझा कृपावंत ॥
साठवितो मी तव रूप साई मम लोचनात ।
साई नाम घेता काय कमी मला जीवनात ॥ २॥
जागते राहावे तुझे स्मरण मम हृदयात।
हीच माझी इच्छा पुरविल साई भगवंत ॥
अंतीचा श्वास माझा जावो तुझ्या सहवासात।
साई नाम घेता काय कमी मला जीवनात ॥ ३॥

- **श्री. लक्ष्मण अनंत सावंत,** बी. ए.
रहिमतबाई इमारत क्र. २, खोली नं. ६३
ताडदेव, मुंबई - ४०००३४

# संत एकनाथ व त्यांची ग्रंथसंपदा

– श्री. विलास श्रीधर कुळकर्णी
१६/ए/४, मीठानगर
गोरेगाव, मुंबई-४०० ०९०.

संत एकनाथ यांचे जीवनकार्य फार मोठे होते. त्यांच्या जीवनाचा कालखंड इ.स. १५३३ ते १५९९, असा सुमारे ६६ वर्षांचा होता. त्यांची ग्रंथसंपदाही विपूल होती.

त्यांचा पहिला ग्रंथ 'चतुश्लोकी भागवत' होय. हा ग्रंथ त्यांनी वयाच्या २० व्या वर्षी लिहिला.

नाथांच्या ग्रंथांच्या ओवी संख्या सुमारे पाऊण लाखाच्या घरात आहे. त्यामध्ये एकनाथी भागवत १८,७७४ ओव्या, भावार्थ रामायण ४०,०००ओव्या (पैकी २५,००० नाथांच्या व उरलेल्या त्यांच्या शिष्य गावबा यांच्या आहेत.) रुक्मिणी स्वयंवर १७१२ ओव्या, चतुश्लोकी भागवत १०५० ओव्या. अभंग सुमारे ४०००, सुमारे ३५० भारूडे. इतका त्यांचा ग्रंथ विस्तार आहे.

एकनाथी भागवत – मूळ भागवताच्या १०६७ ओव्यांवर नाथांनी १८,७७४ ओव्यांचा प्रचंड ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ शके १४९२ ते १४९५ या काळात लिहिलेला आहे. एकनाथांचा हा सर्वात मोठा व प्रसिद्धीस पावलेला हा ग्रंथ आहे. मूळ भागवताच्या १४ पट हा ग्रंथ मोठा आहे.

एकनाथांचा दुसरा तितकाच महत्वाचा व मान्यता पावलेला ग्रंथ 'भावार्थ रामायण' हा होय. सुमारे ४०,०००ओव्यांचा ग्रंथ असून त्यातला अध्याय क्र. ४४ युद्ध कांडपर्यंतचा भाग त्यांनी लिहिलेला आहे. उरलेला भाग त्यांचा शिष्य 'गावबा' यांनी लिहिलेला आहे.

रुक्मिणी स्वयंवर या ग्रंथाचा प्रारंभ नाथांनी गणेश व सरस्वती वंदनाने केला आहे. हा एक काव्य ग्रंथ आहे. नाथांनी हा ग्रंथ शके १४९३ मध्ये पूर्ण केला आहे. यात एकूण १८ प्रसंग त्यांनी वर्णन केले आहेत.

'भारुडे' हा काव्य प्रकार एकनाथांनी लोकप्रिय केला. या भारुडाद्वारे त्यांनी लोकजागृतीचे महान कार्य केले. त्या कार्याला तोड नाही. शिवाय हस्तमतक, स्वात्मसुख, आनंदलहरी, शुकाष्टक, तुलसी महात्म्यं, चिरंजीवपद इत्यादी स्फुट प्रकरणेही आहेत.

नाथांच्या अभंगाची संख्या जवळजवळ ४०००च्या आसपास आहे. नाथांनी आपले लेखनकार्य शके १५२१ म्हणजेच इ.स. १५९९ मध्ये संपवले.

# तेजशलाका

– कु. भारती श्रीपत उथळे
इ/३०१ रिझर्व्ह बँक कॉलनी,
मराठामंदीर मागे, मराठा मंदीर मार्ग,
मुंबई–४०० ००८.

आयुष्यात कधी कधी अशी स्थिती येते की, आपल्या चांगुलपणाचा बदला आपणास वाईट पणानेच मिळतो. मनस्थिती एकदम अस्थिर होते. मार्ग सुचत नाही. ज्या जीवनमूल्यावर, चांगुलपणावर आपला विश्वास असतो, त्याच्याच विरोधी स्थिती पाहून आता कसे जगावे, वागावे म्हणजे मनास शांती मिळेल, या विचारात खोट्याच्याच आहारी जाण्याचा जास्त संभव असतो. कारण खोटेपण प्रतिष्ठेत मिरवताना दिसते. आपला चांगुलपणा एक चूक वाटू लागते. अशावेळी एकच शक्ती आपणास आधार देते. योग्य मार्ग सुचविते. समजावते. श्रद्धा व सबुरीचे महत्व सांगते आणि आपण सावरले जातो. घसरण्याचा क्षण आलेला असतो. विवेकाला पायदळी तुडवून अविवेक सत्ता गाजवू पहातो. पण एकच शक्ती आपणास रोखून धरते. साईशक्ती. भलेपणाचा निष्फळपणा आपल्या लक्षात येतो, तेव्हा पायाखालची जमिन निसटत आहे, असे वाटते. मस्तकबधिर होते. सत्‌सद्‌विवेक चुकीच्या मार्गाकडे जाण्यापासून रोखते व भांबावलेले मन तिकडेच ओढ घेते. तेव्हा एकच शक्ती कणखर आधारासहित आपले चिरंतन अस्तित्व दाखवीत आपणास मायेचा परिस स्पर्श देते. साईशक्तीत उदात्त विचारांच्या कहाण्या खूप ऐकलेल्या असतात. पण जेव्हा त्या कहाण्या सांगणारेच स्वार्थाचा नंगा नाच खेळतात, तेव्हा डोळ्यांपुढे अंधारी येते व तीच सुसह्य वाटते. अशावेळी एकच तेजशलाका दिसते, जी मुखाने बोलत नाही, पण नजरेने गोड प्रेमामृत पाजीत गोड उपदेश करते. तिचे सगुण निर्गुण अस्तित्वच त्या उपदेशाचे मूर्तीमंत रूप असते. ते अस्तित्व प्रथम कार्य करते. दुसऱ्यांच्या भल्याचे नंतर सांगते. तेथे खोटेपणा नसतो. एक पूर्ण सत्य, मूर्तीमंत वैराग्य, विवेक, त्यागाची मूर्ती होय! ही तेज शलाका म्हणजे साईच.

माझ्या साईच्या मुखावर कोटी कोटी सूर्याचे तेज आहे. नेत्रांत चंद्राची शितलता. ओठावर प्रेमाचे अमृत आहे. माऊली ते आपणास पाजत असते. सर्व भक्तगणांच्या दु:खाचे हलाहल पिऊनही माझा साई असा बसतो, जसे नेत्र उघडे असले तरी धीरं गंभीर ध्यानस्थ मनीच. विवेक वैराग्याचा साज माझ्या साईमाऊलीच्या अंगावर दिमाखात झळकत असतो. तिचा कृपाहस्त साऱ्या विश्वाला आशीर्वादरूपी आधार देण्यासाठी सदा उभा असतो. मलीनतेला मांगल्य प्रदान करणारे श्रीचरण. त्याची महती काय गावी. येथे भक्तांची अंतरे विसावतात. समस्त मानवजात नव्हे, तर प्राणीमात्रांनाही येथे येऊन या चरणाच्या आधारे मोक्षगती प्राप्त होते. येथे एकदा श्रम परिहारासाठी आलेला भक्त परत जाताना हे जाणून असतो की, हा देह प्राप्त

झाला आहे तर कर्तव्यकर्मे करण्यासाठी जावेच लागेल,पण शेवटी विसावण्यासाठी, आयुष्य सार्थकी लावण्यासाठी याच चरणाप्रत यावे लागणार आहे.

मोठे मोठे ग्रंथ मी कधी वाचले नाहीत. पण माऊलीच्या तेजोमय रूपाकडे पहात राहिले की वाटते, ती काही सुचवीत आहे. आणि तेव्हा वाटते, म्या मूढमतीला साईमाऊलीने तिच्याविषयी लिहिण्यास तरी बुद्धी द्यावी. तिने मती दिली तसे हे वेडेवाकुडे लिहिले. तिलाच अर्पित जय साईमाय.

माझ्या जिवीचा विसावा, हा साईदयाळा ।

## साईमाऊली

साईबाबा साईबाबा
मुखी साद घालते साई वेडी
मी सर्व दु:खे भोगीन पण
दुसऱ्यांना सुख मिळू दे
गयावया करते मी तुझ्या पुढे
पण तू आम्हाला दूर लोटू नकोस
पडते नत मस्तक तुझ्यापायी
आणि सतत तुझे मुखी नाम घेई
माझी साई माऊली माझी माऊली
संकट येते वेळी धावून
जाता मदतीला भक्ताच्या
कृपा सतत राहावी या भक्तावरी
अहोरात्र मुखी तुझे नाम घेई
किती निर्मळ आहे फक्त
दोनच शब्द या नावात
माझे साई व बाबा
जाता येता, येता जाता
साईबाबा साईबाबा
तुझे नाम घेवून जीव भरला
आता द्या साई आशीर्वाद मजला

**— कु. श्रध्दा शां. संखे.**
आनंदाश्रम, माहिम रोड,
पालघर, जि. ठाणे.

# खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**– साईनंद**

**शुक्रवार, दिनांक ९-२-१९१२**

मी नित्याप्रमाणे उठलो, प्रार्थना केली आणि पंचदशीच्या वर्गाला हजर राहिलो. वर्ग चालू असतानाच आम्ही साईमहाराजांचे ते बाहेर जात असताना दर्शन घेतले. वर्ग संपल्यावर मी मशिदीत गेलो. साईबाबा आज प्रसन्न मुद्रेत होते. नवयुवक किशा, ज्याला आम्ही 'पिश्या' म्हणून हाक मारीत असू, तो रोजच्या प्रमाणे तिथे आला. त्याला पाहून साईसाहेब म्हणाले, पिश्या पूर्वजन्मी एक रोहिला होता. तो फार सज्जन मनुष्य होता, तो बराच वेळपर्यंत प्रार्थना करीत असे, आणि साईसाहेबांच्या आजोबांच्या घरी पाहुणा म्हणून आला. त्यांना एक कन्या होती ती वेगळी राहात असे. साईसाहेब तेव्हा एक तरूणच होते, आणि त्यांनी खेळता खेळता असे सुचविले की या रोहिल्यांनी तिच्याशी विवाह करावा. तसे होणेच योग्य होते व त्याने यथासमय तिच्याशी विवाह केलाही. हा रोहिला आपल्या पत्नीबरोबर तिथे बराच काळ राहिला खरा पण नंतर तो पत्नीबरोबर तेथून गेला. तो कुठे गेला हे मात्र कुणालाच कळू शकले नाही. तो मरण पावला आणि साईसाहेबांनी आपल्या सध्याच्या मातेच्या गर्भात त्याला धारण केले. पिशा, ते म्हणाले, तो खरंच मोठा भाग्यशाली असावा तसेच हजारोंचा तो रक्षक होता. मध्यान्ह आरती नेहमीप्रमाणे झाली. त्यावेळी साईसाहेबांनी शिवानंदशास्त्री यांना काहीतरी खुणावून सांगितले, आणि काही सांकेतिक खाणाखुणा केल्या. दुर्दैवाने शास्त्रीजी त्यांच्या महत्वपूर्ण खुणांचे संकेतांचे अर्थ ग्रहण करू शकले नाहीत. साईसाहेबांनी बापूसाहेब जोगांशीही सांकेतिक खूणा केल्या. ठाण्याचे वकील श्री. ओक येथे आले. मी त्यांना बाबा गुप्ते व इतर मित्रमंडळींची विचारपूस केली आहे म्हणून आठवण केली.

**शनिवार, दिनांक १०-२-१९१२**

मी सकाळी काकड आरतीला हजर राहिलो. आज सकाळीच गणपतरावांनी माझा मुलगा बलवंत बरोबर सातान्याला जाण्याची परवानगी मिळविली. त्यावेळी माधवराव देशपांडे त्यांचेबरोबर होते. मी, बापूसाहेब जोग, उपासनी व सौ. लक्ष्मीबाई कौजलगी यांनी पंचदशीचा वर्ग भरविला. तो संपल्यावर मी मशिदीत गेलो. साईबाबा आज प्रसन्नचित्त मुद्रेत होते, आणि म्हणाले की, त्यांचे धड (शरीराचा वरील भाग) पायापासून अलग केला गेला आहे. त्यामुळे ते केवळ धडालाच वर उचलू शकत होते पण पायांना बिलकुल नाही. ते म्हणाले की आपला व एक तेली यांच्यात संघर्ष झाला. जेव्हा ते तरूण होते, तेव्हा त्यांनी कौटुंबिक कारणासाठी पैसा गोळा केला. आणि कर्जदारांचे कर्ज परतफेड करण्याची सेवा तयारी दर्शविली पण ते परत फेड करू शकले नाहीत. तेव्हा त्यांनी आपल्या डोळ्यात बिबे घातले व शरीराला क्षार फासला आणि ते आजारी पडले. वर्षभर ते रुग्ण म्हणून पडून राहिले. पण ते बरे झाल्यावर

रात्रंदिवस त्यांनी काम करून सर्व कर्ज चुकते केले. ते आज बसल्या बसल्या मोठ्या प्रसन्न मुद्रेने बातचित करीत होते. परंतु मध्यान्ह आरतीच्या शेवटी शेवटी अधीरतेची लक्षणे ते प्रदर्शित करू लागले. नाशिकचे वकील श्री. गद्रे हे येथे आज आले आहेत.

**रविवार, दिनांक ११-२-१९१२**

सकाळी मी माझी प्रार्थना पूर्ण केली तेव्हा मला असे दिसून आले की श्री. गद्रे यांना जाग आली आहे आणि बसून ते त्यांचेशी बोलत आहेत. त्यांनी नाशिकला परत जाण्याची परवानगी मागितली व ते नाशिकला निघूनही गेले. आम्ही साईसाहेबांचे ते बाहेर जातानाचे वेळी दर्शन घेतले. आम्ही आमचा पंचदशीचा वर्ग भरवला तिथे त्यावेळी उपासनी, बापूसाहेब जोग, श्रीमती कौजलगी व श्री. लेले - जे नाशिक जिल्ह्याचे महसूल निरीक्षक अधिकारी होते - ही मंडळी हजर होती. श्री. लेले एक चांगले सद्गृहस्थ होते, व साई महाराजांनाही ते खूप आवडत असत.

जेव्हा साईबाबा मशिदीत परत आले तेव्हा मी नित्याप्रमाणे मशिदीत गेलो. तिथे मी बऱ्याच मंडळींना बसलेले पाहिले. त्यापैकी बरेच जण मला अनोळखी, नवखे होते. त्यापैकी एक जण अकोला पोलीस होते. त्यांनी मला पहाताच ते म्हणाले, आपण आपल्या पदाचा राजीनामा दिलेला आहे आणि आता नागपूरच्या बॅरिस्टर गोविंदराव देशमुख यांचेकडे सेवारत आहोत. मध्यान्ह आरती व भोजन झाल्यावर मी काही वेळ लवंडलो आणि दिक्षितांच्या रामायणाच्या पुराणकथानक कार्यक्रमाला हजर राहिलो. नंतर आम्ही साई महाराजांच्या दर्शनार्थ ते जेव्हा संध्याकाळच्या रपेटीला बाहेर पडतात त्यावेळी दर्शन केले. श्री. लेले यांची भेट झाल्याने त्यांचेबरोबर उभ्या उभ्याच गोष्टी करीत राहिलो. सायंकाळी वाडा आरती झाल्यावर शेज आरती झाली. त्यानंतर भीष्माचा भागवत पाठ, श्री. दिक्षितांचे रामायण वाचन झाले. शिवानंद शास्त्रींना आज परत जाण्याची परवानगी मिळाली नाही.

**मंगळवार, दिनांक १३-२-१९१२**

श्री. दिक्षितांनी रामायणाचा पाठ केला. नंतर आम्ही मशिदीत गेलो. मी मशिदीत प्रवेश करतो न करतो तोच साईमहाराजांनी मला उदी दिली. याचा अर्थभाव मी जाणला की मला येथून जाण्याची परवानगी मिळाली असा आदेश आहे. त्यानंतर ते म्हणाले, "तुम्हाला परत जा म्हणून कोण सांगतो? बसा तिथे." नंतर ते स्वतः बसून मोठ्या प्रसन्नपणे गप्पा करू लागले, आणि म्हणाले, सध्या जी गाय दिक्षितांजवळ आहे ती मूळ म्हाळसापतींची होती. त्यानंतर ती औरंगाबादला गेली, नंतर जालन्याला गेली आणि आता पुन्हा परतून श्री. दिक्षितांच्या संपत्तीच्या रूपात आहे. ती कुणाची संपत्ती हे एकटा परमेश्वरच काय तो जाणे. माझ्याकडे बघून ते म्हणाले, ज्याचा परमेश्वरावर दृढ विश्वास आहे. तो कुणाच्याही अन्य वस्तूची इच्छा करीत नाही, बाळगीत नाही. माझी पत्नी व इतर व्यक्ती तिथे होत्या. आम्ही सर्वांनी ते सायंकाळच्या रपेटीस बाहेर पडताना दर्शन घेतले. नंतर वाडा आरती

व त्यानंतर शेजारती झाली. रात्री भीष्मांचे भजन व दिक्षितांच्या रामायणाचे वाचन झाले. साईबाबांनी आज मध्यान्ह आरती आणि शेजारतीनंतर माझे नाव प्रामुख्याने पुकारून मला बोलावले आणि मला वाड्यात जाण्यास सांगितले.

# चरित्र–घडण

**– श्री. शाम जुवळे**

जनार्दन भुवन,
९ छबिलदास मार्ग,
दादर (प.), मुंबई ४०० ०२८

ये ग, ये ग, विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ॥
इतुक्या सहीत त्वाबा यावे । माझे अंगणी नाचावे ॥
माझा रंग तुझे गुणी । म्हणे नामयाची जनी ॥

संत नामदेवाच्या साध्या भोळ्या जनाबाईचे हे हृदय-बोल. सहृदय भक्ताच्या काळजाला जावून भिडतात. यालाच जातिभेदातीत हृदय-भाषा असे संबोधिले जाते. आपले अंतरंग आपणास देवाच्या सद्‌गुणात दिसावे,यासारखे परमभाग्य जगात दुसरे नाही.

साई—साई नाम आठविता ।
आठवती साई-गुण ॥
एकेका त्या गुणामध्ये ।
दिसती श्रीसाईचे चरण ॥

श्रीसाई-भक्ताला सर्वत्र श्रीसाइनाथांचे समचरण दिसत असतात. सम-बुद्धी, सम-भाव मनामध्ये जागृत झाल्यावर देह-बुद्धी लुप्त होऊन तेथे देव-बुद्धी स्थापित होत असते.

रामायण म्हणजे श्रीरामचंद्राने आखून दिलेला मार्ग (आयन) होय. या पथावर वाटचाल केली असता चरित्राची घडण सहजगत्या निर्मल होत असते. मल, विक्षेप आणि आवरण (अज्ञान) या मनाच्या विकारापासून भक्त अलिप्त राखला जातो. निष्कलंक जीवन तेजाने प्रकाशित केले जाते. प्रकाश म्हणजेच ज्ञान होय. अज्ञानाची अंधारी रात्र संपली म्हणजे भक्ताच्या जीवनात सौभाग्याची मंगल पहाट उदयास येत असते. प्रारब्धाचे भोग कितीही प्रखर असले तरी ज्ञान-प्रकाशात ते सर्व हतबल होत असतात. ही साई-कृपा होय.

# वाणी

– सौ. सुरेखा सुरेश पवार
द्वारा श्री. सुरेश मारुती पवार,
इरीगेशन कॉलनी,
मु. मो. पानशेत, जि. पुणे, पानशेत.

हे जगत् जेथे रंगते, दंग होते व कधी कधी भंग पावते, असे हे सामर्थ्य कशात असेल, तर ते फक्त ह्या 'वाणी'मध्ये. वाणी माधुरी निर्माण करण्यात आघाडीवर असेल तर त्याच्यापुढे कटुता उत्पन्न करण्यात अग्रेसर असते. काही लोकांनी वेसन घालण्यात यश मिळविले असले, तरी ते कठीणप्रायच काम असते. भगवंताचे नामस्मरण करण्यासाठी जिचा सुलभतेने वापर करता येतो, तीच कधी कधी मेनका होऊन तपश्चर्येचा भंग करते, तर कधी त्राटीका बनून अक्राळविक्राळ रूप धारण करून सारी सात्विकता गिळंकृत करते.

सत्यता हीच असते की या लवचिक आणि निर्बुद्ध बाहुलीला आपल्या तंत्रांपेक्षा संताच्या मंत्राने बद्ध करायचे असते, शुद्ध करायचे असते. वैयक्तिक जीवनात जरी हिची अत्यंत गरज असली तरी, हिची ख्याती पाहूनच हिच्याशी वागावे. ही उन्मत्त महाराणी प्रमाणे सिंहासनावर बसून वर्चस्वाचे खड्ग फिरवीत असते. हिची दुष्टता दुर्योधनास मागे सारते. तत्वांची राखरांगोळी करून सत्वशील चारित्र्याचे वस्त्र उतरविणे तर हिचे पहिले काम असते. त्यातूनही हृदयातील श्रीकृष्णाच्या भक्तीचा अंश त्या चारित्र्याच्या पाठीमागे असेल तर त्या त्या प्रमाणात रक्षण होते, अन्यथा येथे हानीच हानी नजरेस येते. शांती तर मग दूर पळून जाते. शांती चित्तातही नसते व कृतीतही नसते. हे 'वाणी'चे चक्र असा संहार करते की, फिरून तिथे पाहणे सुद्धा धिटाईचे काम होते.

पुढे एक दिवस केव्हातरी, कोठेतरी ही थबकते. निमिषभर स्वानुभूतीने सर्वत्र पाहते. त्यावेळी आपण किती अंधत्वाने वागत होतो, रहात होतो, आता जीवंत असताना मेल्याप्रमाणे लोक आपल्याशी वागतात, ते केवळ ह्या 'वाणी' मुळे, हे समजते. तेव्हा आता वाटत असते की, आपणास कोणी समजावून कसे सांगितले नाही की, हे ठीक नाही. ही वाट अनिश्चितता जाणते. त्या वाटेने ये, निश्चितपणे भव्य सुंदरत्व लाभलेल्या द्वारकेत जाशील, जिथे प्रेमच प्रेम आहे, वात्सल्य वात्सल्यच नांदते. परंतु षड्रिपूंच्या प्रभुत्वामुळे सर्व अवयवांनाच बधीरपणा आलेला होता. आता मात्र हा क्षण परतण्याचा आहे. ह्या वाणीवरच्या निखाऱ्यांनी काय काय भक्ष्य केले असेल. पण केवढे सुदैवं ह्या क्षणी मला त्याचा पश्चात्ताप होत आहे. ह्या पश्चातापाच्या अग्नीने मी जळत आहे. मला आता कोणी तरी यावे, नि शांत करावे. कणाकणाने तरी अमृत शिंपडावे, तृप्त करावे.

ह्या भस्मासुराचा वध केल्यानंतर स्वन नल्या असुरांना तिलांजली देवून त्याला

मारणाऱ्याचा जयजयकार करावा. अनेक संत महंतांच्या पावलांनी पवित्र झालेली, त्यांच्या 'वाणी'ने समृध्द केलेली वाट आपणही चालावी. 'वाणी'ने शब्दगंध घ्यावे. आपल्या शक्तीनुसार चालण्याचा सातत्याने प्रयत्न करावा. मनी परमेश्वर, ध्यानी परमेश्वर, सर्वत्र परमेश्वर, कृतीत, स्मृतीत सर्वत्र तोच तो व्यापून उरावा. ही वाट लांब खरी, तरीही मोहक, अति मोहक। त्या शामसुंदरा इतकीच सुखदायक। त्याला द्यायला द्यावे सुदाम्याचे पोहे आणि सोबत सुदाम्याचे अतंःकरणही असावे. एवढे असेल तर तो स्वतः तुमची पूजा करेल. त्याचा प्रेमळ स्पर्श सर्वांगास होईल. आभाळासहित पृथ्वी मिळाल्याचा आनंद होईल. मग भाग्याला पारावार उरणार नाही.हे केव्हा घडेल,जेव्हा ही 'वाणी' सतत त्याचे नाम घेईल. त्याचे गुणगान करेल. त्याला सतत आळवेल, आर्ततेने.

ही वाणी एक तेजोमय अस्त्र होईल. स्वतःतील दुष्टत्वासमवेत इतरांचेही दुष्टत्व ती नाहिसे करू शकेल. त्यांच्या 'वाणी'वर प्रभूचे नाम पेरण्यास ती समर्थ होईल. हृदयात सो हं चा सागर तयार होईल.तिथे सद्‌गुरु साईनाथ सात्विकतेच्या शेषावर विराजमान होतील. हे सारे घडेल जेव्हा 'वाणी'त सतत त्याचे नाम घेईल.

॥ ॐ तत् सत् ॥

# साई आणि भक्त

साईला ना आई
बाप ना साईला
का हा दावा केला
खुळ्यावाणी

आम्ही भक्त सारे
त्याचे मायबाप
आम्हा मायबाप
साईनाथ

साईला ना धर्म
साईला ना जात
नाही गणगोत
असे कसे?

आम्ही भक्त सारे
त्याचे गणगोत
साई धर्मजात
भक्ताचीच

- ग. दे. कुळकर्णी
शाम नगर,
अमरावती - ४४४ ६०६.

# साईदरबारातील माणिक आणि मोती – ९
## चित्रकारमहर्षि श्री. शामराव जयकर
## सौ. सत्यभामाबाई जयकर



श्री. शामराव जयकर



सौ. सत्यभामाबाई जयकर

**● – साईनंद**

श्रीभगवान साईबाबांच्या शिरडीत द्वारकामाईमध्ये श्रीधुनीसमोरच असलेल्या श्रीसाईनाथांच्या चितारलेल्या नयनमनोहर अप्रतिम चित्राचे चित्रकार आहेत, कै. शामराव रामचंद्र विनायक जयकर. श्री. शामराव जयकर यांनी काढलेले हे चित्र चित्रकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिध्द आहे. इतकेच नव्हे तर श्रीसाई खरेखुरे कसे काय दिसत असत, याची कल्पना त्यांच्या या चित्रावरून स्पष्ट येते.

कै. शामराव जयकर यांचा जन्म १८६४ किंवा १८६५ साली झाला असावा. त्यांचे जन्मस्थान मुंबई. ते एक सुखवस्तू पाठारे प्रभू कुटुंबातील. शामरावांचे आजोबा विनायक हरी शंकर ७५५ . ८ तत्कालीन ब्रिटीश राजवटीत एक प्रथित यश कायदेपंडित होते. शामरावांचे वडील रामचंद्र त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी वारले, व शामराव, आई, धाकटे तीन बंधू व एक बहीण यांच्यासह त्यांचे मामा बांबासाहेब अजिंक्य (भाऊ रसूलचे नातू) यांच्या घरी आश्रयाला आले. शामरावांचा शिक्षणक्रम तत्कालीन मिशन स्कूलमध्ये झाला. मिशन ट्रेनिंगमुळे त्यांचे इंग्रजीचे ज्ञानही वरच्या दर्जाचे होते. लहानपणापासून त्यांना चित्रकलेचा विलक्षण नाद व त्यावेळी त्यांनी

कुणाचेही उत्तेजन नसतानासुध्दा आपला व्यासंग चालूच ठेवला. त्यांचे मामा बाबासाहेब अजिंक्य हे चार गावे मालाड, अकुर्ली, भाईंदर इ.चे खोत व पोर्ट ट्रस्टच्या अर्ध्या धक्क्याचे मालक होते. पोर्ट ट्रस्टच्या धक्क्याला अजूनही "भाऊचा धक्का" म्हणून सर्व ओळखतात. स्वभावाने बाबासाहेब अतिशय कडक. ते अक्कलकोट स्वामींचे निस्सीम भक्त होते. लहानपणी शामरावांचा कान अतिशय दुखत होता, तेव्हा त्यांना घेऊन बाबासाहेब व इतर मंडळी मुद्दाम अक्कलकोटला गेली. पण शामरावांना तिथे निवासी ठेवून, ती सर्व मंडळी महाराजांच्या दर्शनास गेली. तेव्हा महाराजांनी शामराव कुठे आहे, अशी विचारपूस केली, तेव्हा शामराव येत नाही, तो तुफान करतोय, असे बाबासाहेबांनी सांगितले. तेव्हा महाराजांनी त्याला ताबडतोब घेऊन या, असे फर्मावले. शामरावांना महाराजांकडे नेत असताना त्यांचा कान खूपच दुखत होता, इतका की, त्यांनी रस्त्यात आरडाओरड व खूप तुफान केले. पण महाराजांच्या समोर गेल्याबरोबर महाराज-शामराव चांगली दोन मिनिटे दृष्टीभेट झाली व तेवढ्यात आश्चर्य घडले असे की शामरावांच्या कानाचा क्लेशदायक ठणका अजिबात बंद झाला, तो कायमचाच. वयाची विशी गाठल्यावर तरुण शामरावांनी आपल्या मामांचे – बाबासाहेबांचे घर सोडले. ते स्वभावाने फार भाविक होते. स्वतंत्रपणे वावरू लागल्यावर त्यांना त्यावेळी भाटिया ज्ञातीत एक महाराज होते, त्यांच्याकडे चित्रकार म्हणून पाऊणशे रूपयाची नोकरी मिळाली.

शामरावांची चित्रकलेतील प्रगती त्यांचे पणजोबा घारोजी यांनी लक्षात घेतली. घारोजींना गुजराथी समाजात बरीच मानमान्यता होती. शामरावांना घेऊन घारोजी श्री. लक्ष्मीदास खिमजी नावाच्या एका मान्यवराकडे गेले. घारोजींनी आपला हा पणतू चित्रकार आहे, अशी ओळख करून दिली. लक्ष्मीदासांनी शामरावांना राजकोटला पाठवून दिले. श्री तख्तसिंग नावाचे राजकोटचे तत्कालीन अधिपती होते. त्यांचेकडे शामराव गेले. सोबत लल्लूभाई सामळदास इ. ची शिफारसपत्रे त्यांच्याबरोबर होती. राजकोटला शामरावांना तख्तसिंग यांनी खूप काम दिले व सर ाशंकर पट्टणी हे युवराज भाऊसिंगजी यांचे शिक्षक होते, त्यांच्याकडे शामरावांची ण्या-खाण्याची-रहाण्याची सोय करण्यात आली. तिथे दिलेले काम शामरावांनी गदी हुबेहूब पूर्ण केलेले पाहून बघावयास आलेले सर्वच जण खूष झाले. यापूर्वी काठेवाडात बरेच युरोपियन चित्रकार येऊन पैसे कमावून गेले होते. पण एका भारतीय चित्रकाराचे कौशल्य पाहून शामरावांचा तिथे बराच बोलबाला झाला. तख्तसिंग हे एक गुणज्ञ व उदार अंत:करणाचे राजे होते. त्यांनी त्यांचे काम पाहून ते इतके खूष झाले की, काय वाटेल ते माग, म्हणून त्यांनी त्यांना सांगितले. शामरावांनी सांगितले असते तर दरबारातील मानकऱ्याची जागा सहज त्यांना मिळाली असती. पण मी परत येईन तेव्हा आपणास भेटेन, असे सांगून कामाचा मोबदला मिळाल्यावर शामराव मुंबईस परतले. पुन्हा ते जेव्हा राजकोटला गेले, तेव्हा तख्तसिंगाची राजवट बदलून भाऊसिंगाची राजवट सुरू झाली होती व प्रभाशंकर पट्टणी दिवाण झाले होते. पण हे

दोघेही हिशेबी होते, तेव्हा शामरावांना तिथे भरपूर काम मिळाले खरे, पण प्राप्तीचे मान त्यामानाने कमीच होते. म्हणून ते पुन्हा मुंबईस आले.

पुढे दैवयोगाने शामरावांना अक्कलकोटच्या राणीसाहेबाचे काम मिळाले. पुढे शामरावांनी मुंबई-पुणे येथे काही वर्षे काढली. १९०६ साली खानबहादूर खंबाता म्हणून पुणे लष्करात एक वजनदार पारसी गृहस्थ होते. त्यांच्या आग्रहावरून १९१६ पर्यंत त्यांनी तिथे वास्तव्य केले. लष्करात रूस्तमजी घड्याळी म्हणून त्यावेळी एक दागदागिन्यांची पेढी होती. घड्याळे पण तिथे विक्रीसाठी ठेवली जात. खंबाता साहेबांच्या शिफारसीवरून फॅन्सी पोरट्रेटस् ठेवण्याचा क्रमही तिथे सुरू झाला. पुण्यात त्यावेळी पावसाळ्यात गव्हर्नर सोहबांचा मुक्काम असे, म्हणून बरेच राजे-रजवाडे पुण्यात मुक्काम करीत, व रूस्तुमजी घड्याळींच्या पेढीवरून जाताना आतील तैलचित्रे पाहून पेढीमध्ये प्रवेश करीत व एखादे चित्र खरेदी करीत असत. त्याबरोबर दाग-दागिने-घड्याळेपण घेत. अशा प्रकारे खाजगी कामे, शिकवण्या, दुकानातील चित्रे काढून शामरावांनी ते दिवस काढले.

यावेळी शिरडीत साईबाबा म्हणून एक साक्षात्कारी विभूतीचे वास्तव्य आहे म्हणून शामरावांच्या मेव्हण्यांनी (कै. क्रिकेटवीर वामन बापूजी तळपदे) माहिती सांगितली. याच दरम्यान शामरावांचे स्नेही व साईबाबांचे भक्त कै. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनी शामरावांना स्वतः शिरडीस जाऊन श्रीसाईबाबांचे चित्र काढावे, म्हणून विनंती केली होती. व त्यांना जरूर ती ओळख देऊन मदतही दिली. त्यावेळेपर्यंत श्रीसाईबाबांचे ते शिळेवर बसलेले असे एकच एक चित्र उपलब्ध होते. शामराव शिरडीस गेले व तिथे त्यांनी बाबांच्या भक्तमंडळींची मदत घेऊन बाबांना विनंती करून त्यांचे तैलचित्र काढले. बाबांनीही त्यांची विनंती मान्य केली व बाबांचे तैलचित्र त्यांनी मशिदीत बसून काढले. त्यांनी प्रथम पेन्सिल स्केच काढले व बाबांचा चेहरा प्रथम रंगविला व दिक्षितांच्या वाड्यात बसून बाकीचे काम पूर्ण केले. ते चित्र इतके हुबेहूब होते की, स्वतः बाबांनी त्यांची प्रशंसा केली. शामरावांनी या चित्रासारखी आणखीन चार चित्रे काढली. १९१७ साली शामरावांनी एक तैलचित्र स्वतः पूजेसाठी काढले व बाबांच्या हाती दिले. साईबाबांनी हे चित्र "चावडी उपर लगाव" म्हणून शामरावांना सांगितले. शामरावांना त्याचा अर्थ लागला नाही व त्यांच्या मनाचा पण विसर पडला. पुढे साईबाबा १९१८ साली समाधिस्त झाल्यावर १९२५-२६ साली बाबांचे भक्त हरी सीताराम दिक्षित, रा.ब. मोरेश्वर प्रधान इ. मंडळींनी शामरावांकडे ते तैलचित्र बाबांच्या बैठकीच्या जागेत लावण्यासाठी मागितले. तेव्हा शामरावांना फार आनंद झाला. तेव्हा त्यांनी त्या तैलचित्रास व्यवस्थित वारनिश करून, काच, फ्रेम करून त्यांच्या स्वाधीन केले. तेच तैलचित्र आज बाबांच्या बैठकीच्या जागी, धुनीसमोर लाखो लाखो भाविकांच्या नेत्रांना साक्षात् बाबाच जणू तिथे बसलेले आहेत, म्हणून आनंद देत आहे. या अत्यंत सुंदर चित्रातील जिवंतपणा शब्दात वर्णन करून सांगता येणार नाही.

इ. सन १९१७ साली शामरावांना धंद्यात काही कटू अनुभव आला व मधुमेहाची पीडा जडली. त्याच्या शमनार्थ ते सहकुटुंब ८-९ महिने शिरडीस वास्तव्य करून राहिले. पण या अवधीत त्यांचा रघुनंदन नावाचा ५ वर्षांचा गौरवर्णी सुंदर मुलगा गोवरामुळे देवलोकी गेला. मृत्यूआधी हा मुलगा सर्व दिवस साईबाबांच्या जवळ बसत असे व आरतीच्या वेळी दरबारात भालदाराप्रमाणे उभा राही. पुढे शामरावांच्या पत्नी व तीन-चार मुले मुंबईस परतली, पण शामराव शिरडीसच राहिले. कै. सारणाबाई चांदोरकर यांनी शामरावांची उत्तम व्यवस्था ठेवली होती. या काळात डॉ. पिल्ले यांच्या गैरहजेरीत शामरावांना बाबांची चिलीम भरून देण्याची कामगिरी मिळाली होती.

१९१७ साली पावसाळ्यात शामराव बाबांची परवानगी घेऊन मुंबईस परतले. पुढे त्यांना सांताक्रूझ येथे शेठ नरोत्तमदास भानजी या एका श्रीमंत कापडाच्या व्यापाऱ्याकडे त्यांच्या बंगल्यात एक स्वतंत्र खोली मिळून जेवणखाणही मिळून त्यांनी दिलेल्या फोटोप्रमाणे तैलचित्रे काढणे, असे काम मिळाले. १९२२ पर्यंत ते तिथे होते. पण पुढे जागतिक मंदीमुळे त्यांचे ते काम सुटले.

शामराव हे जसे उत्कृष्ट चित्रकार होते, तसे उत्तमपैकी मूर्तीकारही होते. पार्ल्यास असताना पार्ले टिळक विद्यालयासाठी १९२३ साली गणपती उत्सवानिमित्त त्यांनी श्रीगजाननाची उत्तम मूर्ती तयार करून दिली होती. लोकमान्य सेवा संघासाठी त्यांनी मूर्ती तयार करून ती टिळक मंदिरात बसविण्यात आली होती. अंतरकर नावाच्या रामदास स्वामींच्या भक्ताच्या आग्रहानुसार त्यांनी समर्थ रामदास स्वामी गुहेबाहेर उभे आहेत व दुरून श्री शिवाजी महाराज काही मावळ्यांसह त्यांना भेटावयास येत आहेत, असे बहारदार चित्र काढून दिले होते. मधुमेहाची प्रकृती असून सुध्दा रेळे नावाचे एक वैद्य पार्ले येथे रहावयास आले असता, त्यांनी शामरावांकडून त्यांच्या गुरूचे एक व श्रीदत्तात्रेयाचे एक, अशी मोठ्या साईजची पेंटिंग्ज तयार करवून घेतली होती. कोणत्याही चित्रावर सुरुवातीसच अत्यंत सात्विक भाव आणून सुंदर चेहरा काढणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. आर्ट स्कूलमध्ये कोणत्याही प्रकारचे शिक्षण न घेता शामरावांनी तैलचित्रकार म्हणून स्वतंत्र आयुष्यक्रम घालविला. १९०३-०४ साली मुंबई वरिष्ठ न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सर लॉरेन्स जैकिन्स यांची पत्नी ही फ्रेंच अकादमीची शिष्या होती. तिची काही प्रसंगाने शामरावांशी गाठ पडून त्यांच्या कामाची तिने मुक्त कंठाने प्रशंसा केली व स्वतः युरोपियन रंगांच्या मिश्रणाची कला शामरावांना शिकविली. १९१४ साली पुण्यात टेनिसन कोल नावाचा एक इंग्रज आर्टिस्ट होता, त्यानेही त्यांच्या कामाची प्रशंसा केली व आपलीही कामे शामरावांना दाखविली. रंगाची बचत करून काम कसे उठावदार होते, हे त्याने शामरावांना सांगितले होते.

तैलचित्राखेरीज शामरावांच्याकडे आणखीन एक जबरदस्त कला होती, ती म्हणजे हस्तीदंतावरील, जलरंगातील व्यक्तिचित्रे. तैलचित्रे काढणारे अनेक नामांकित चित्रकार होऊन गेले पण जलरंगाने हस्तीदंतावर, आंगठीमध्ये, लॉकेटस्‌मध्ये

रहाणारी व काही त्याहून जराशी मोठी वेगवेगळ्या आकाराची, केवळ ठिपक्या ठिपक्यांनी काढलेली पण दुर्बिणीशिवाय ठिपके न दिसणारी अशी पोर्ट्रेटस् किंवा ती काढणारे चित्रकार मुंबईत नव्हतेच. त्यावेळी आंगठीत रहाणाऱ्या साईजपासून साधारण अडीच ते तीन इंचाचे वेगवेगळ्या साईजचे २९ नमुने एकत्र करून ते त्यांनी एका फ्रेममध्ये बसविलेले आहेत व हे सारे काम ७०-८० वर्षापूर्वी केलेले असून त्यात अद्याप काहीच फरक पडलेला नाही, व त्यातील रंगसौंदर्य व व्यक्तीचे साम्य पहाणाऱ्याची दृष्टी मात्र त्यावर खिळून राहाते. हे हस्तीदंत शामराव कुठून आणीत, त्याला लागणाऱ्या वेगवेगळ्या साईजच्या काचा ते कुठून मिळवीत किंवा ही कला त्यांच्याकडे कशी काय आली, त्या कलेचा त्यांनी कसा काय विकास साधला ही बाब मात्र अगदी अज्ञानच आहे. पण त्यांच्या या कलेची बरोबरी मात्र कुणीच करू शकलेले नाही.

चित्रकार शामरावांच्या सुशील व सुविद्य पत्नीचे नाव होते, सौ. सत्यभामाबाई. त्या पूर्वाश्रमीच्या कु. घारूबाई तळपदे. त्या उत्तमपैकी गुजराती व इंग्रजी बोलत असत. त्यांचे माहेर गिरगावात त्यावेळच्या डुक्करवाडीत होते. त्यांचे डोळे घारे होते म्हणून त्यांचे नाव घारूबाई असेच ठेवण्यात आले. त्या पाठारे समाजात मिळून मिसळून वावरत व समारंभप्रसंगी इंग्रजीतून भाषणे देत असत. श्री. शामरावांच्या शिर्डी वास्तव्यातही होत्या. श्रीसाईनाथ महाराज त्यांना "मामी" या नावाने संबोधित. आपल्या शिर्डी वास्तव्यात त्यांनी बाबांची भरपूर सेवा केली, पण रघुनंदनच्या मृत्यूमुळे त्यांच्या बाबांच्या बद्दलच्या भावना नंतर कडवटच झाल्या होत्या. पण त्यांनी आपल्या सर्व मुलांना सांगून ठेवले की, त्या स्वतः जरी काही बोलल्या तरी मुलांनी मात्र साईबाबांबद्दल काहीही गैरउद्‌गार कधीही काढू नयेत. सौ. सत्यभामाबाई शामराव जयकर या १९४१ साली वयाच्या ६६ व्या वर्षी निधन पावल्या, तर श्रीसाईबाबांच्या चित्राचे थोर नामवंत व बाबांचाच शुभाशिर्वाद लाभलेले चित्रकार श्री. शामराव जयकरजी हे ११ एप्रिल १९३८ रोजी दिवंगत झाले.

विशेष म्हणजे या दिवशी शामरावांचा धाकटा मुलगा श्रीपाद हा मॅट्रिकच्या परीक्षेस बसला होता व त्याचा अगदी पहिलाच पेपर होता. शामरावजी तो परीक्षेस जाताना कोमामध्ये होते पण तशाही अवस्थेत त्यांनी आपला हात उंचावून त्यास शुभाशिष प्रदान केले. श्रीपाद परीक्षेस बसला व त्यांचा आशीर्वाद फळाला आला. तो उत्तम प्रकारे यशस्वी उत्तीर्ण झाला, इतकेच नव्हे तर वडिलांच्या हातातील चित्रकला त्यांच्या हातात तंतोतंत उतरली. प्रस्तुत लेखकाने श्रीपादच्या कुंचल्यातून उतरलेली चित्रे पाहिलेली आहेत. त्यापैकी अक्कलकोट स्वामींचे काढलेले चित्र तर बहारदार आहे. प्रस्तुत लेखाच्या लेखकाने त्यांच्या हातची मधुर दाक्षेही खाल्लेली आहेत. दादरच्या किर्ती कॉलेज ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापकांची नऊ तैलचित्रे त्यांच्याकडून काढून घेतली असून ती सर्व कॉलेजच्या वाचनालयात लावण्यात आलेली आहेत. तसेच मैलापूर मद्रास [illegible]ील ऑल इंडिया साई समाजाच्या साई

मंदिरात त्यांनी काढलेले साईंचे चित्र लावण्यात आलेले आहे. म्हैसूर येथल्या साईमंदिरातही त्यांनी काढलेले साईचित्र लावलेले आहे. शामरावांचे हे कलाकार पुत्र श्रीपाद आज हयात नाहीत. त्यांचे एकमेव चिरंजीव आज हयात आहेत, ते म्हणजे श्री. सुरेंद्र जयकर. त्यांचे वास्तव्य आज माहिम येथे आहे.

श्रीसाईनाथांचे हुबेहूब चित्र काढून पुढील अनेक पिढ्यांना बाबांच्या चित्रांची देणगी दिलेले चित्रकार शामराव जयकर यांना साईदरबारातील श्रेष्ठ अमोल माणिक म्हणून संबोधण्यास मुळीच हरकत नाही.

## श्रीसाईंची आरती

जय साई जय साई आरती गाऊ
साईदर्शन घेण्या शिर्डीला जाऊ
जय साई जय साई आरती गाऊ ॥ धृ.॥
डोईवर फेटा, अंगात कफनी
सोज्वळ रूपाची, साधीच राहणी
पाहून साईंचे रूपे हे नयनी
हर्षाचा सागर, उंचबळे मनी
साईचरणी, श्रध्देची सुमने वाहू
जय साई जय साई आरती गाऊ ॥ १॥
दिली तू अनाथांना प्रेमाची छाया
लोकांच्या कल्याणा झिजविली काया
धावसी केव्हाही भक्तांच्या साहाय्या
श्रद्धा, सबुरीचा दिला मंत्र जपाया
साईंच्या कार्या, आम्ही वाहून घेऊ
जय साई जय साई आरती गाऊ ॥ २॥
विभूतिने होती सर्व दु:खे दूर
दर्शनमात्रे तुझ्या थांबे हूरहूर
ईश्वररूपी तू साई अवतार
पाहूनी मूर्ति तुझी जुळती कर
साईभक्त आम्ही सर्व भाऊ भाऊ
जय साई जय साई आरती गाऊ ॥ ३॥.

**- श्री. मिलिंद रमेशराव जोशी**
श्री. द. शं. घोडजकर यांचा वाडा,
वकिल कॉलनी, कंधार,
ता. कंधार, जि. नांदेड - ४३१७१४.

# तुमचे श्री गणपतीविषयक सामान्य ज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे दहांची देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे.)

१) श्रीगणपतीला नेहमी ...... रंगाची फुले वहातात. ती त्याला प्रिय आहेत.
अ) पिवळी, ब) पांढरी, क) जांभळी, ड) लाल-गुलाबी.

२) सर्व गणेशभक्तांची काशी म्हणून ..... हे ठिकाण प्रसिध्द आहे.
अ) मोरगाव, ब) तासगाव, क) रांजणगाव, ड) हेदवी.

३) बल्लाळेश्वराचे दर्शन घ्यावयाचे असेल तर तुम्हास .... येथेच गेले पाहिजे.
अ) प्रभादेवी, ब) पाली, क) पद्मालय, ड) मुरूड.

४) शिवशंकराची जशी १२ जागृतस्थाने तशी गणपतीची ..... स्थाने जागृत आहेत.
अ) ३, ब) ६, क) ८, ड) १४.

५) कृतयुगात श्रीगणेशाला ....., त्रेतायुगात ....., द्वापारयुगात ....., व कलियुगात ....., अशी नावे पडली आहेत.
अ) विनायक, ब) मयुरेश्वर, क) गजानन, ड) धूम्रवर्ण.

६) सिद्धटेकच्या श्रीसिद्धीविनायकाची उपासना व सेवा ..... या प्रख्यात संताने केली होती.
अ) केडगावचे नारायण महाराज, ब) माणगावचे वासुदेवानंद सरस्वती, क) साकुरीचे उपासनी महाराज, ड) हुबळीचे श्रीसिद्धारूढ स्वामी.

७) महर्षि व्यासांनी गणेश पुराणात व विभांडक मुनींनी मुद्‌गल पुराणात ...... गणेशाची महती गायिलेली आहे.
अ) मयुरेश्वर, ब) वरदविनायक, क) विघ्नहर, ड) श्रीबल्लाळेश्वर.

८) श्रीमंत थोरले माधवराव पेशवे हे ..... चे अनन्य भक्त होते.
अ) श्रीलंबोदरस्वामी अदोझा, ब) थेऊरचा श्रीचिंतामणि, क) विज्ञान गणेश, राक्षसभुवन ड) प्रवाळ गणेश पद्मालय.

९) ..... या गणपतीचे उलट मार्गाने दर्शन घेण्याचा प्रयत्न नाना फडणवीस यांनी केला तेव्हा त्यांच्यावर भुंगे व मधमाशांनी कडाडून हल्ला चढविला.
अ) ओझरचा विघ्नहर ब) राजूर गणपती, जालना, क) लेण्याद्रीचा गिरीजात्मक, ड) श्री चिंतामणि कळंब.

१०) ...... या गणपतीची दररोज शिडीवरून पूजा केली जाते
अ) वाईचा ढोल्या गणपती, ब) गिरगावचा फडके गणपती, क) पुण्याचा मातीचा गणपती, ड) कसबा गणपती पुणे.

११) मोरया गोसावींचे दर्शन घ्यावयाचे असेल तर तुम्हास .... येथेच जावयास हवे.
अ) पाचवड, ब) वडगाव, क) चिंचवड, ड) पिंपळगाव बसवंत.

१२) दुष्यंत-शकुंतला पुनर्भेटीचे प्रतीक म्हणून ..... हा गणपतीच ओळखला जातो.
अ) श्रीगणेश गणपतीपुळे, ब) श्रीसिद्धीविनायक टिटवाळा, क) दशभुंजलक्ष्मी गणेश - हेदवी, ड) श्रीसिद्धीविनायक, नांदगाव.

**— सदानंद चेंदवणकर**

उत्तरे:

१) - ड, २) - अ, ३) - ब, ४) - क, ५) - अ, ब, क, ड ६) - अ, ७) - ड, ८) - ब, ९) - क, १०) - अ, ११) - क, १२) - ब.

# भजन

तुझे नाव साईनाथ। जमले भक्त शिरडीत।
किती आनंदे गाती नाचती। पालखीचे सोहळ्यात॥
गतजन्माची पूर्वपुण्याई। रामनवमीला आलो साई॥
दर्शन घेता समाधी मंदिरी। दिसला मजला साईनाथा
तू कौसल्येचा सूत ॥ १॥
तुझे नांव साईनाथ। जमले भक्त शिरडीत।
किती आनंदे गाती नाचती। पालखीचे सोहळ्यात॥
गुरूपौर्णिमा आषाढमांशी। ओढून नेले मज शिरडीशी।
समाधीची चढता पायरी। झाला भास मम चक्षूशी॥
तू अनुसूयेचा सूत ॥ २॥
तुझे नांव साईनाथ ....
ओढ लागली तुझिया चरणी। म्हणूनी पातलो जन्माष्टमी॥
आलो मंदिरी तुझिया नाथा। परि भासला मजशी साई
तू देवकिचा सूत ॥ ३॥
तुझे नांव साईनाथ .....
काय वर्णू समभाग्याला। पुण्यतिथीला योग लाभला॥
दर्शन तुझिये होता साई। झाली प्रेरणा मम मनाला॥
तू प्रत्यक्ष रे भगवंत ॥ ४॥

**- श्री. एम. टी. सूर्यवंशी**
ज्युनिअर इंजिनियर, एम. आय.,
जिल्हा परिषद, किनवट,
जि. नांदेड (मराठवाडा).

# इति श्री साई उवाच

– श्री. डी. जी. देशपांडे
खूर-सिल-नाझ, कोहिनूर रोड,
दादर, मुंबई ४०० ०१४.

(मागील अंकावरुन क्रमशः)

१०३

"होता इतुका मातेचा कळा। तरी कां हा वेष स्वीकारला।
साजेना ममत्व या वेषाला। कलंक भगव्याला लाविला॥
जा बैस त्वां व्हावें न उदास। जाऊं दे कीं थोडे दिवस।
करू मग पुढील विचारास। धीर त्वां चित्तास धरावा॥
वाड्यांत असती बहुत चोर। कवाडे लावोनि रहावे हुशार।
सर्वस्वाचा करीतील अपहार। घाला अनिवार घालितील॥"
"तुझी पूर्वपुण्याई गहन। तेणेंच आलासि हा ठाव ठाकून।
आतां मद्वचनीं द्यावे अवधान। करूनि घे साधन जीवाचें॥
उद्यांपासून भागवताचें। परिशिलन करावें साचें।
तीन सप्ताह त्या ग्रंथाचे। कायावाचामनें करीं॥
होऊनियां निर्वासन। करीं त्या ग्रंथाचे श्रवण।
अथवा मनोभावें वाचन। निदिध्यासन तत्पर॥
प्रसन्न होईल भगवंत। सर्व दुःखाचा करील अंत।
होईल मायामोह शांत। सौख्य अत्यंत लाभेल॥
होऊनियां शुचिर्भूत। ठेवुनी हरिचरणी चित्त।
संपादी हें साङगव्रत । मोहनिर्मुक्त होशील॥"

१०५ – अ. ३१ वा

"पुरे झाली आतां शिरडी। ही घे खर्ची बारारोकडी।
तपार्थ जाईं मच्छिंदरगडीं। सुखनिरवडीं वस तेथें॥
सावधान होऊनि मानसी ।
परिस गा तूं मद्वचनासी। विकल्पसायासीं पडूं नको॥
जाई मच्छिंदरगडीं सत्वर। करीं प्रत्यही तप त्रिवार।
काहीं काळ क्रमल्यावर। स्वानंद निर्भर होसील॥
"शिरडींत असता अनेक कल्पना। उठूं लागले तरंग नाना।
म्हणोनि तुझीया चंचल् मना। गड प्रयाणा नेमियले॥
पृथ्वी – आपादिकांच्या गारा। रचोनि रचियेल्या या अगारा।
साडेतीन हातांचिया घरा। शिरडी बाहेरा नव्हतों तुजा॥
आतां जो येथें तोच कीं तेथें। पाहूनि घेईं स्वस्थ चित्तें।
तेथूनि जें म्यां पाठविलें तूतें। तें येच निमित्तें तूं जाण॥" – अ. ३१ वा

१०६

"न करा खंत। येथेच होता तयाचा अंत।
"तोही मोठा पुण्यवंत। सौख्य अत्यंत पावला॥
त्या तक्क्याचे पलिकडे। शंकराचे देऊळ जिकडे।
नेऊन त्याला पुरा तिकडे। नंदी निकट द्या गती॥
पुरलिया तेथे तयाप्रति। लाधेल तोही सद्‌गती।
ऋणनिर्मुक्ति बंधमुक्ति। तुमचिया हस्तीं पावेल॥
गतजन्मींचा देणेदार। फेडावया ऋण हा अवतार।
तुमचिया बंधनी साचार। तो आजवर राहिला॥"

— अ. ३१ वा

१०८

"एकदां आम्ही चौघेजण। वाचूनि पोथीपुस्तक पुराण।
करूं लागलो ब्रह्मनिरूपण। ज्ञानसंपन्न होऊनि॥
ऐसे आम्ही चौघे सुबुध्द। निघालों लावूं काही शोध।
स्वबुध्दीनेंच व्हावा तो बोध। स्वतंत्र निर्वेधमानसे॥"
रानीं वनीं॥
"होऊनियां दिशाभूल। भ्रमलो इतस्ततः निर्फळ।
थोर दैवाचे तेणेंच हें स्थल। मागुती निश्चल पावलों॥
दैवें लाविले आल्यावाटे। पूनश्च पूर्वील वणजारी भेटें।
कार्य सान अथवा मोठें। मार्ग दावावया लागे बोटें।
शोध न लागे रित्या पोटें। बुध्दिचे फाटे अफाट॥
असल्याविण ईश्वरी घाट। मार्गी होई न कोणाची गांठ।
देऊं नये अन्नासी पाठ। वाढिलें ताट डावलूं नये॥
भाकरतुकडा देई कोण। घे खा म्हणे तयाचे वचन।
मानावा पूर्ण शुभशकुन। कार्य निर्विघ्नकारक॥
मज लागली होती भूक। तृषेने कोरड कंठास सोक।
णजारियाचेंही प्रेम अलौकिक वाटलें कवतुक तयाचे॥
म्हणोनियां आदरपूर्वक। वणजारियाने दिलेला एक।
कतकोर खावोनि प्यालो मी उदक। तों काय कौतुक वर्तले॥
गुरूराज आले अकल्पित। म्हणती वादावादी किमर्थ।
ग निवेदिला इत्थंभूत। वर्तला वृत्तांत तयांस॥
तो अत्यंत आनंद निर्भर। भोगिले जें सौख्य अपार। तें काय पामर मी वानूं॥"
'काय गोड गुरूंची शाळा। सुटला जनक जननीचा लळा।

तुटली मोहममतेची शृंखला। लाधलो अवलिळा मुक्तता॥
जें जें घडे ते देव घडवी। तोच उतरवी तोच चढवी।
तोच लढे अथवा लढवी। कर्ता करवी तो एक॥

— अ. ३२ वा

१०९

"अन्नमन्नाद विष्णुस्वरूप। उपास तापास आणि निर्लेप।
निराहार आणि निराप। किमर्थ हा व्याप वाऊगा॥
काय आवश्यकता आपुल्याला। उपास तापास करायाला॥"
"जा त्या दादाभटाचे घरीं। खुशाल पुरणाच्या पोळ्या करीं।
तयाच्या पोरांबाळास चारीं। स्वयेंही पोटभर तूं खाई॥"

— अ. ३२ वा

११०

"कोणाचे देणें कोणास पुरतें। कितीही द्यावे सदा अपुरतें।
माझें सरकार जैं देऊं सरतें। न सरतें तें कल्पांतीं॥
देणें एक माझ्या सरकारचें। तयासी तुले काय तें इतरांचें।
अमर्यादास मर्यादेचें। भूषण कैचें असावें॥
माझें सरकार न्या न्या वदें। मजलाच जो तो म्हणे दे दें।
कोणी न माझ्या बोलासीं लक्ष दे। एकही सुथें ऐकेना॥
उतून चालिला आहे खजिना। एकही कोणी गाड्या आणीना।
खणा म्हणतां कोणीही खणीना। प्रयत्न कोणा करवेना॥
मी म्हणें तो पैका खणावा। गाड्यावरी लटुन न्यावा।
खरा माईचा पूत असावा। तेणेंच भरावा भांडार॥
आमुची तरी काय गती। मातीची होऊन जाईल माती।
वारा जाईल वाऱ्याच्या संगती। येईना मागुती हा वेळ॥
असो माझीया फकिराची कळा। माझिया भगवानाची लीळा।
माझिया सरकाराचा ताळा। लई निराळा न्याराच॥
मीही कधींच कोठें जातों। कोण्याही ठायीं जाऊन बसतों।
परी हा जीव मायेत घोंटाळतो। गोते खातो अनिवार॥
माया आहे फार कठीण। तिणें केलों मी हीन दीन।
माझीया माणसांची रात्रंदिन। घोंकणी करून असतो मी॥
जो जो जैसें जैसें करील। तो तो तैसें तैसे भरील।'
ध्यानांत ठेवी जो माझे बोल। सौख्य अमोल पावेल तो॥"

— अ. ३२ वा

१११

जयास बाबा प्रेमभावा। बाहती 'बापूगीर' या नांवा।
म्हणती जाई खुशाल तूं गांवा। मार्गी विसांवा घे थोडा॥

आधीं जाई जामनेरा। उतर तेथें नानांच्या घरा।
घेऊनि तयांच्या समाचारा। मग तूं पुढारा मार्ग धरीं॥
उतरून देई कागदावरती। शामा तो अडकराची आरती। गोसाव्या हातीं नानां तैं॥'
"तूं स्वस्थ जाईं। लागेल तुझी सर्व सोयीं।"

— अ. ३३ वा

११३

"काळजी कांहीं न धरी मनीं। उतार पडेल उद्यांपासुनि।
एक आठवडा संपता क्षणीं। बसशील उठूनी तूं स्वयें॥"

— अ. ३३ वा

११४

"मशीदीच्या आश्रया जे येती। तयां न दुर्गती कल्पांती॥
आतां तुम्ही निश्चिंत असा। उदी घ्या ता व्रणावर फांसा।
येईल गुण आठांचौदिवसां । ठेवा भरंवसा देवावरी॥
मशीद नव्हे ही द्वारावती। येथें जयांचे पाय लागती।
तात्काळ क्षेम आरोग्य पावती। येईल प्रतीती तुम्हांही॥
येथें येता आराम न पडे। हें तों काळत्रयींही न घडे।
जो या मशीदीची पायरी चढे। तयाचे बेडे पार जाणा॥"

— अ. ३४ वा

११५

"अजून मजवरी अविश्वास नां।"

— अ. ३४ वा

११६

"निर्भय मनीं राहीं तूं"। "किमर्थ दहा जन्मांचा पांगू"।
अवघ्या दहा दिवसांचा भोगू। भोगं विभागून परस्पर॥
मोक्ष स्वार्थ वा परमार्थ। द्यावया मी असतां समर्थ।
हाच का तुझा पुरूषार्थ। मरणानर्थ मागसी॥
आणवा त्यास उचलूनी। भोग हा साहू कीं तो भोगुनी।
जावें न ऐसें गांगरून। आणावा मारूनि पाठीवर"॥
"नाना पागल। पट्टी सोड तूं मरशील।
आतां काऊ येऊनी टोंचील। मग तू होशील चांगला"॥

— अ. ३४ वा

११८

"पहा भाऊ। लागला बरे आतां गाऊं।"
"तू जांई। स्वस्थ वाड्यांत पडून राहीं।
आतां काऊ फिरून नाहीं। येणार पाहीं टोचावया।।
तोच नाहीं का येऊन गेला। तोच ज्याणे पाय दिधला।
तोच तो काऊ टोचून पळाला। नारू तळाला घातला।।"

— अ. ३४ वा

११९

"नको जाऊं अपरात्रीस। उदी दे तियेस पाठवूनी।।
कशाच्या ग्रंथी कशाचा ताप। आपुला अल्ला मालिक बाप।
बरें होईल आपोआप। होईल सुखरूप निर्घोर।।
मात्र तूं सकाळी सूर्योदयीं। साऊळ विहिंरीस जाऊन येईं।
आतांच नको जाण्याची घाई। स्वस्थ राहीं तूं येथे"।।
"शामा उठाउठी ये मागुता। विलंब लागतां कामा नये"।।

— अ. ३४ वा

१२०

"पहा कर्माची गहन गती।
मी करीं ना करवीं काहींही निश्चिती। कर्तृत्व मारिती मज माथां।।
कर्मे जीं जीं अदृष्टें घडत। मी तो तेथील साक्षांभूत।
कर्ता करविता तो एक 'अनंत'। कृपावंतही तो एक।।
मी ना देव ना ईश्वर। मी ना 'अनल हक्क' ना परमेश्वर।
'यादे हक्क' मी यादगार। बंदा मी लाचार अल्लाचा।।
सांडुनियां अहंकार। मानुनि तयाचे आभार।
तयावरी जो घालील भार। बेडा तो पार होईल"।।

— अ. ३४ वा

१२१

"कां यावें जी"।
तो का सांगे रे तुजप्रती।
"तुझे मनी देण्याची नव्हती।
म्हणुनि नाहीं मागितली तुजप्रती। देणे चित्तीं तर देईं"।।
"जासील रे क्षण एक बैस"।
"तुम्हा आम्हांतील तेल्याची भिंत। पाडुनियां ती टाक समस्त।
होईल मग मार्ग प्रशस्त। अरस परस भेटावया"।।

— अ. ३५ वा

१२२

"टाक रे खाऊन"। "खाऊनि टाक"

"हा कुठला काकाचा मालक। त्याचा मालक आहे आणिक"।

"होतां एक चंचलबुध्दि। घरी धनधान्याची समृध्दि।
शरीरीं नाही आधी व्याधि। नसती उपाधी आवडे।।
उगाच बोजा वाही माथा। हिंडे इतस्ततः नाहीं स्वस्थता।
खाली ठेवी उचली मागुता। नाहीं निश्चलता मनास।।
पाहुनि ऐसी तयाची अवस्था। कींव आली माझीया चित्ता।
वाटेल त्या एका ठायीं आतां। ठेव रे निश्चितता म्हणालो।।
उगाच ऐसा भ्रमतोस। एका ठायींच स्वस्थ बैस"।।

— अ. ३५ वा

१२३

"दक्षिणें ज्याने मजला। असेल एक रूपय्या दिधला।
दशगुणें मज तया मोबदला। द्यावा लागला मोजून।।
मी काय कोणाचें घेईना फुकट। मागें न मी सर्वां सरसकट।
फकीर जयासी दावी बोट। तयासींच गोष्ट दक्षिणेची।।
तोही फकीर जयाचा ऋणी। तयासींच ही करी मागणीं।
दाता देऊनि करी पेरणी। पुढें संवगणी करावया।।
वित्त हे केवळ धर्मद्वारा। वित्तवंता पडेल पाहें उपकारा।
धर्मैकफळ हें एणेंच खरा। ज्ञानासी थारा लाधतो।।
दुःखसंपाद्य हें वित्त। केवळ आहे इष्टोपभोगार्थ।
व्यर्थ निष्कारण वेंचितात। धर्मसंचित अवगणुनि।।
करूनियां कबडी कबडी। अर्बुदान्त धन जे जोडी।
तें विषयस्वार्थाचिया आवडी। कदा न दवडी तो सुखी"।।
"आम्ही तरी काय करितों। एकपट घेतो दसपट देतों।
क्रमे क्रमे ज्ञानपथा लावितों। लोभ उठतो धरमसीतें।।

— अ. ३५ वा

१२४

"अल्ला मालिक" मुखी निरंतर — अ. ३५ वा

१२५

"मी न आणितां कोणी न येती"।

"माझी इच्छा झालिया वीण। दारवंठा त्यागील कवण।
कोणा स्वेच्छें होईल दर्शन। घडेल आगमन शिर्डीचे"।।

— अ. ३५ वा

१२६

"शाम्या तुजला ठाऊक नाहीं। मी तो कोणाचे काहीं न घेईं।
येणे मागे मशीद आई। ऋणमुक्त होई देणारा॥
मजला काय आहे घर। किंवा माझा आहे संसार।
जे मज लागे वित्ताची जरूर। मी तो निर्धोर सर्वापरी॥
परी ऋण वैर आणि हत्या। कल्पांतींही न चुकती कर्त्या।
देवी नवसिती गरजेपुरत्या। मज उद्धरित्या सायास॥
तुम्ह।. नाहीं त्याची वाळती। वेळेपुरती करितां अजीजी।
अनृणी जो भक्तांमाजी। तया मी राजी सदैव॥
आरंभी हा अकिंचन तयासी। पंधरा देतांच केले नवमासी।
पहिला मुशाहिरा देईन देवासी। भूल तयासी पडली पुढें॥
पंध्राचे तीस झाले नंतर। तिसाचे साठ, साठाचे शंभर।
दुप्पट चौपट वाढता पगार। बळावला विसर अत्यंत॥
होतां होतां जाहले सातशे। पातले येथें निजकर्मवशें।
तेव्हां मी माझे पंधरा हे ऐसे। दक्षिणामिषें मागितलें॥

— अ. ३६ वा

१२७

"कधीं अवघ्या बहात्तर पिढींत। लाविला रे म्यां तुज हात। असे कां स्मरत पहा बरें॥"

— अ. ३६ वा

१२८

"काय नारळें पोरें होती।
ऐशा कैशा वेड्या समजुती। चळले वाटती जन लोक"॥
"नारळ फोड"। "होईल जा रे पोर।" बारा महिन्यानंतर।

— अ. ३६ वा

१२९

'सांभाळ मज'॥
जातोस जा परी रात्री माजी। मधून मधून खबर घे माझी।

— अ. ३७ वा

१३०

नाना तुजकडून। व्हावें कैसे हें विस्मरण।
हेच काय त्वां केले संपादन। मजसवे दिन घालवूनि॥
त्वां माझी केली संगती। अखेर तिची हीच का गती।
ऐसी कैसी भ्रमली मती। यथानिगुती सांग मज॥

"वर्षानुवर्ष माझी संगती। असतां तुझी हेच कां गती।
काय झाले तुझीया मतीं। बाबा वदती नानातें।।
कोपरगांवी कधी आला। वृत्तान्त काय वाटेसी घडला।
मार्गात मध्ये कोठें उतरला। तांगा हांकिला की थेट।।
नवल काहीं घडलें वाटे। साद्यंत परिसावे ऐसें वाटे।
सांग पां झाले काय कोठें। असो मोठे सान वा"।।
"बरी ही नव्हे ऐसी त्वरा।
सुटलासि काट्यावरी तूं बरा। करूनि अनादर दर्शनीं।।
दत्तासारिखे पूज्य दैवत। असता सहजमार्गी तिष्ठत।
अभागी जो दर्शन वर्जित। मी काय पावत तयासी"।।

— अ. ३८ वा

१३१

"आतां समस्तीं लहानथोरीं। जावें जेवाया आपुलाल्या घरीं।।"
"पिऊनि घे रे तें समस्त"। योग न हा परत जणुं गमला।।

— अ. ३८ वा

१३३

नाना काय गुणगुणसी । म्हण रे स्पष्ट हळू जे म्हणसी ।
येऊं दें कीं ऐकू मजसी। पुटपुटसी जे गालात।।
"नाना तृतीय चरण। पुनश्च लक्षांत घेई पूर्ण।
'ज्ञानं शब्दामागील जाण। अवग्रह आण अर्थास।।
हें मी काय वदें विपरीत। अर्थाचा काय करतों अनर्थ।
असत्य काय पूर्वील भाष्यार्थ। ऐसेंही निरर्थ ना मानी।।
ज्ञानी आणि तत्वदर्शी। 'ज्ञान' उपदेशिती ऐसें जें म्हणसी।
तेथे 'अज्ञान' पद जै घेसी। यथार्थ घेसील प्रबोध।।
ज्ञान नव्हे बोलाचा विषय। कैसें होईल तें उपदेश्य।
हणोनि ज्ञान शब्दाचा विपर्यय। करीं मग प्रत्यय अनुभवीं।।
।रिसिला तुझा ज्ञान-पदार्थ। अज्ञान घेता काय रे वेचंत।
'अज्ञान' वाणीचा विषय होत। 'ज्ञान' हे शब्दातीत स्वयें।।

— अ. ३९ वा

१३४

वाडा देऊळ होऊं द्या प्रकट। पुरवीन अभिष्ट सर्वांचे।।
"आम्ही आपुले ठिकाणीं। म्हणोत कोणी काहींही।।

— अ. ३९ वा

१३५

'देऊळ पूर्ण झालियावरती। येऊं की वस्तीस आपणही''॥
''वाडा पुरा झालिया पाठी। आपुलेसाठींच तों लावूं॥
तेथेंच आपण बोलूं चालूं। तेथेंच आपण अवघे खेळूं।
प्रेमे आपापणां कवटाळूं। भोगूं सुकाळू आनंदाचा''॥
'फोड फोड'
''मजला वाड्यांत द्या ठेवून''।

# साई चरणी (सु) मन

मन करोनी पिंपळपान
लिहा त्यावर साईनाम
वाहा ते द्वारकामाईत
होऊनी निराभिमान ॥ १ ॥

मन करोनी गुलाब
भरा त्यात प्रेमसुवास
वाहा ते समाधीवर
सोडूनी द्वेषभाव ॥ २ ॥

मन करोनी कमळ
ठेवा त्यास निर्मळ
वाहा ते गुरुस्थानी
जाऊनी अनन्य शरण ॥ ३ ॥

मन करोनी तुळस
गाठा भक्तिचा कळस
वाहा ते चावडीत
पुजूनी साईकृष्ण ॥ ४ ॥

**— सौ. प्रतिभा जयकांत दमनिया**
टी–६७/५, सायन हॉस्पिटल
स्टाफ क्वार्टर्स, सायन (प.),
मुंबई–४०० ०२२.



# ज्वलंत जागृत शनिदेवाचे देवस्थान

– श्री. म. वि. सामन्त
मु. पो. म्हापण, म. सा प्राज्ञ सिंधुदुर्ग,
व्हाया - कुडाळ, सिंधुदुर्ग ४१६५२२.

आपला महाराष्ट्र देश संस्कृतीप्रधान आहे. महाराष्ट्रीयन श्रध्दाळूही आहेत. श्रध्देला स्थान आणि निष्ठेला प्राधान्य देण्यासारखी देवस्थाने आपल्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आहेत. त्यातल्या त्यात अहमदनगर जिल्ह्यातील देवस्थानांना अग्रक्रम द्यावा लागेल.

नगर जिल्ह्यात शिर्डीचे साईबाबा एकमुखीदत्त म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांच्या दर्शनाला आणि सेवेसाठी लांब-लांबून दर दिवशी अगणित भक्तमंडळी येत असतात. जणू एखादी जत्रा भरली आहे असाच भास होतो. तर साकुरीला बाबांचे शिष्य उपासनी महाराज भक्तांची मनोकामना पूर्ण करण्यासाठी तत्पर आहेत. त्या ठिकाणचे पावित्र्य आस्तिक्यभावना वेदमंत्रपठण तसेच नित्य होणारे भगवद्‌गीता अष्टावक्रगीता यांचे पाठ ऐकताना अत्यंत समाधान वाटते. नास्तिक माणसालाही आस्तिक बनवण्याइतके सामर्थ्य त्या ठिकाणी आहे.

पुराण काळात याज्ञवल्की मैत्रेयी गार्गी यांसारख्या महान विदुषी स्त्रिया होऊन गेल्या. त्यांची वास्तवता साकुरीच्या उपासनी महाराजांचे मठात आढळून येते. आणि त्यांचे दर्शन घेतल्यावर धन्यता वाटते.

त्याप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे तालुक्यात शनिदेवाच्या आगमनामुळे शिंगणापूर हे गाव अत्यंत प्रसिध्दीस आले आहे. या गावी शनिमहाराजांचे जागृत देवस्थान आहे.

शिंगणापूर हे गाव लहानसे आणि टुमदार असून गावची लोकसंख्या सुमारे हजार बाराशेच्या दरम्यान आहे. येथील शनिदेवाच्या जागृत देवस्थानाबद्दल कर्णोपकर्णी काही गोष्टी ऐकल्यावर शनिमहाराजांचे प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन दर्शन घेण्याची अनिवार इच्छा झाली.

आमचे एक शेजारी सद्‌गृहस्थ या भागातील सर्व लोक त्यांना काका-मास्तर म्हणून ओळखतात. त्यांनी माझ्याकडून शनिदेवाच्या शिंगणापूरचे स्थान महात्म्य ऐकल्यावर आपल्या मनाशी शिंगणापूरला जाण्याचा ठाम निश्चय केला. आणि ते माझेकडे पंचांग घेऊनच आले आणि मला म्हणाले, ''तुम्ही आणि मी उद्याचे वैशाख वद्य अमावास्येला शिंगणापूरला शनिमहाराजांचे दर्शनाला जायचे आहे. प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन शनिदेवाचे दर्शन शक्यतेप्रमाणे यथाशक्तिसेवा, पूजा करून स्थानमहात्म्य पाहून येऊ. माझे सोबत तुम्हाला आले पाहिजे. त्यांच्या इच्छेनुसार आम्ही दोघेही शिंगणापूरला जाऊन पोहोचलो.

शिंगणापूरला जाताच प्रथमतःच शनैश्वराची मूर्ती डोळे भरून पाहिली. मनाला अत्यंत समाधान वाटले. या शनिदेवाचेदेवस्थान अत्यंत जागृत असून पाच फूट नऊ

इंच उंचीची मूर्ती उन्हात उभी राहून खडा पहारा करीत आहे, असा भास होतो.

या गावात विटामातीची घरे मोठमोठाली आहेत तसेच गरीब लोकांच्या गवतारू झोपड्या आहेत. पण या इमारतींना अगर झोपड्यांना दरवाजे आहेत पण त्यांना झडपा नाहीत. इतकेच काय, धनगर, कुणबी इत्यादी मागासवर्गीय जमातीत फिरून पाहाता शेळ्या-मेंढ्या यांचे खुराडे, गाईबैलांचे गोठे यांनाही दरवाजाला झडपा नाहीत.

तेथील लोकांना, कोंबड्यांना मुंगूस घार यांपासून त्रास होत नाही का? असे विचारले तर ते म्हणतात, या गावात शनिदेवाच्या कृपेने आमच्यावर तसा वाईट प्रसंग केव्हाही येत नाही. त्यांची शनिमहाराजांवरील निष्ठा आणि श्रध्दा पाहून त्यांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर निर्माण झाला.

शनिदेवाची पूजा, अभिषेक इत्यादी सर्व विधी आम्ही यथासांग पार पाडल्यावर सायंकाळी चार नंतर शिंगणापूर गाव पाहायला मी व माझे बरोबर गेलेले काका मास्तर, शिंगणापूर परिसरात फिरायला गेलो व प्रत्यक्ष काही धनगर, कुणबी, मराठी समाजाच्या लोकांच्या घरात भेटी दिल्या. त्यांचेशी त्यांची सांसारिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिती अजमावण्यासाठी काही बातचित केली.

त्यांनी दिलेल्या उत्तरावरून आम्ही निष्कर्ष काढला की, शिंगणापूर परिसरात राहणारे लोक आतिथ्यशील असून त्यांच्यात सामाजिक स्थैर्य असून परस्परांबद्दल आदर, स्नेहभाव आणि सहानुभूति आहे. लोकांना मदत करणे, सलोख्याने वागणे या गोष्टी त्यांच्या वृत्तीत विशेष दिसून येतात. तसेच शिंगणापूरचे लोक देवाधर्माला स्मरून पापभीरू वृत्तीने वागणारे वाटले. शिंगणापूरच्या लोकांचा शनिदेवावर गाढ विश्वास, नितांत श्रध्दा व अढळ विश्वास आहे. शनिदेवाच्या यात्रेच्या वेळी प्रत्येक माणूस कुणाही पांथस्थाला मदत अगर सेवा करायला तयार असतो.

अमावास्येच्या दिवशी अगर शनैश्वराचे यात्रेच्या वेळी पाच लिटर तेल मावेल एवढ्या अभिषेक-पात्रातून तेलाचा अभिषेक अव्याहत चालू असतो. तसेच भाविक भक्तमंडळी सव्वा, पाव या प्रमाणात तेल वाहाताना दिसतात. तसेच बाजूला असणाऱ्या विहिरीतून पाणी काढून त्याचाही अभिषेक शनिमहाराजांचे मूर्तीवर केला जातो.

भाविक भक्त मंडळी शनिमहाराजांना आवडणाऱ्या वस्तू म्हणजे, बिबे, उडीद, खोबरे, कवड्या, तेल, अबीर, गुलाल, हळद, पिंजर इ. वस्तू वाहून संकल्पयुक्त पूजा ब्राह्मणांकरवी करतात.

शनिदेवाची पूजा करताना अत्यंत पवित्रपणा शुचिर्भूतपणा ठेवायला हवा. त्या ठिकाणी जरासुध्दा मलीनपणा चालत नाही. पुरुषांना ओलेत्याने शनिमहाराजांचे चबुतऱ्याचे कठड्यावर चढून पूजा, अभिषक अगर प्रदक्षिणा करणे, या गोष्टींना परवानगी आहे परंतु कठड्यावर स्त्रियांना जायला सक्त मनाई आहे.

शनिदेवाच्या आसमंतात लहान लहान दुकाने आहेत. जर यांत्रिक लोकांना शनिदेवाची पूजा करण्याची हौस अगर इच्छा असेल, त्यांना मार्गदर्शनपर पुस्तकात

लिहिल्याप्रमाणे पुजेचे साहित्य योग्य मोबदला घेऊन दिले जाते. अमावास्या अगर शनिदेवाच्या उत्सवाचे दिवशी बाहेर गावचे ब्राम्हण येऊन महाराजांवर अभिषेक करतात, अगर पूजा सांगतात. हा पुजेचा प्रकार भक्तगणांच्या आगमनानुसार अव्याहत चालू असतो.

शिंगणापूरला गेल्यावर यात्रेकरूंना आंघोळीसाठी स्वतंत्र पाण्याचे नळ असून त्या नळाखाली उभे राहून आंघोळ करता येईल, अशी सोय आहे. यात्रिक दमून भागून गेले तरी पाण्याची आंघोळ केल्यावर खूप ताजेतवाने होऊन महाराजांची सेवा करण्यास उत्साही बनून उद्युक्त होतात. शनिमहाराजांची पूजा भर उन्हात करत असताना एक प्रकारचा आगळा आनंद होत असतो.

मूर्तीच्या जवळ एक लिंबांचे झाड दहा बारा हात अंतरावर आहे. परंतु त्या झाडाच्या फांदीची सावली शनिदेवावर पडली तर ती फांदी आपण होऊन नाश पावते, या गोष्टीचे अनेक लोकांनी निरीक्षण केले आहे.

निसर्गरम्य नयनमनोहर अशा छोटेखानी गावात प्रवेश केल्यावर आणि शनिदेवाचे दर्शन झाल्यावर माणूस आपल्या सांसारिक विवंचना साफ विसरून जातो. त्याच्या मनात शनिमहाराजांबद्दल भक्ति, श्रध्दा आपोआप निर्माण होते.

शनिदेवाच्या यात्रेव्यतिरिक्त शिंगणापूरला बाहेर गावचा एकही माणूस दिसत नाही. गावातील माणसे आपल्या कामात गर्क असतात. त्या ठिकाणी महाराजांचे जत्रेच्या वेळी गावोगावची लाखो माणसे येतात. परंतु इतर ठिकाणच्या जत्रांमध्ये होणाऱ्या गडबड गोंगाटाच्या मानाने बरीच शांतता असते आणि तेथील वातावरण शांत व प्रसन्न असते.

शनि महात्म्यामध्ये "शनैश्वराची मूर्ति काळी। चरण पंगू सुरत चांगली, पूजा करी काळभैरवाची।" असे शनिदेवाचे वर्णन आहे. त्याचा दृक प्रत्यय शिंगणापूरच्या या मूर्तीचे दर्शन घेताना येतो. भाविकांची दर्शनासाठी लागलेली झुंबड, व यात्रेच्या दिवशी होणारी भाविकांची गर्दी पाहून मन भारावून जाते.

शिंगणापूरला शनिच्या परिसरात दत्त, मारूती यांची देवळे आहेत. तसेच जवळच पूर्ण प्राथमिक शाळा, धर्मशाळा अशा अनेक इमारती आहेत. या सर्व इमारती दगडी भिंतींच्या कौलारू व पक्क्या स्वरुपाच्या आहेत. पण त्यांनाही दरवाजाला झडपे लावलेली नाहीत. शाळेच्या मुख्याध्यापकांना मी या बाबत विचारले तेव्हा ते म्हणाले, आमचे गावचे खरेखुरे वैशिष्ट्य हेच आहे की, शनिमहाराजांचे बाबतीत बोलायचे तर –

देव आहे पण देऊळ नाही<br>
मोठ मोठी घरे आहेत, हवेल्या आहेत,<br>
पण त्यांना दारे नाहीत<br>
वृक्ष आहे पण छाया नाही.

# स्वामी स्वरुपानंदांचे शिष्य –
# स्वामी अमलानंद

– श्री. भालचंद केशव गन्द्रे
"सुख निवास",
चेंदणी, ठाणे (प.) ४००६०१.



[पावसच्या स्वामी स्वरूपानंदांचे सत्‌शिष्य प.पू. स्वामी अमलानंद यांचे नुकतेच निर्वाण झाले. त्यांच्यासंबंधीचा हा लेख प्रकाशित करून त्यांना श्रध्दांजली वाहात आहोत – का. संपादक ]

रत्नागिरी हे अनेक संतांचे माहेरघर आहे. अनेक संत-महात्म्यांनी ह्या भूमीत कायम आश्रय घेतला आहे. स्वामी स्वरुपानंदांमुळे पावसची (रत्नागिरी) किर्तीही दाहीदिशा पसरली असून, पावसला आज तीर्थाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वामी स्वरूपानंद हे श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे शिष्य मानले जातात. स्वामी स्वरूपानंदांनी भाविकांना श्रध्दा-भक्ति-नाम वाटण्याचे अवतारकार्य हयातभर करून, देह ठेवण्यापूर्वी आपले कार्य त्यांनी श्रीअमलानंद यांच्यावर सोपविले.

स्वामींच्या शिष्य-परंपरेतील श्री अमलानंदांचे मूळ नाव श्री. लक्ष्मण रामचंद्र फडके! सात्विक, धार्मिक व स्वाभिमानी अशा कुटुंबात त्यांचा दि. ७ जानेवारी १९०३ रोजी जन्म झाला. परंतु वडिलांच्या अचानक मृत्यूमुळे त्यांच्या आईनेच काबाडकष्ट करून त्यांना लहानाचे मोठे केले. शाळेत लक्ष्मणाची हुषार विद्यार्थ्यांत गणना होई आपल्या कुशाग्र बुध्दिने वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी त्यांनी श्रीमत्

शंकराचार्यांच्या 'परापूजा' या स्तोत्राचे उत्कृष्ठ मराठी काव्यात भाषांतर करून शास्त्री लोकांची शाबासकी मिळवली. अत्यंत परिश्रमपूर्वक ते वकील झाले. पुढे कस्टम खात्यात नोकरी मिळाल्यावर त्यांचे लग्न झाले. पण पहिल्या पत्नीचा २ वर्षातच मृत्यू झाल्याने, त्यांना दुसरे लग्न करावे लागले.

आईच्या सात्विक-धार्मिक स्वभावामुळे व संतसमागमामुळे लक्ष्मणरावांना लहानपणापासूनच अध्यात्माची विशेष गोडी लागली. तत्कालीन सर्व साधु-संतांची त्यांनी दर्शने घेतली. आपणही गुरू करावा, ह्या आशेने ते प्रत्येक संतांना प्रार्थना करीत. पण, "तुझा गुरू वेगळा आहे - त्याला अजून वेळ आहे - तोवर धीर धर" असे सांगून, जो-तो त्यांना दूर ठेवी. मनात तीव्र इच्छा असूनही, गुरू मिळत नसल्याने, ते निराश होत. पण तरीही गुरू शोधण्यासाठी ते नाना संतांकडे जातच राहिले. ह्या शोधात त्यांना एकाकडून तंत्र-मंत्र विद्याही मिळाली. पण श्री. रावसोहब सहस्त्रबुध्दे ह्या महाराजांनी त्यांना ह्या विद्येपासून दूर रहाण्याचा सल्ला दिल्याने ते पुन्हा नामाधीन झाले.

ज्ञानेश्वरी, दासबोध, गीता, भागवत इ. संत वाङ्मयाचाही त्यांनी सखोल अभ्यास केला. गुरूची थोरवी समजल्यावर तर ते गुरूभेटीसाठी आतुर झाले नि दि. २५/९/१९५२ रोजी, त्यांच्या आयुष्यातील तो भाग्याचा सुवर्णदिन उजाडला.

एक गृहस्थ त्यांच्या घरी येऊन म्हणाले, "आपण फडके काय? श्री स्वामी स्वरुपानंदांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे. त्यांनी हा अनुग्रहाचा कागद आपल्यासाठीच दिला आहे."

कुठले स्वामी स्वरूपानंद? त्यांची माझी ना ओळख, ना गाठ, मग अनुग्रह कुठला नि तोहि अशा टीचभर कागदावर? असे विचारांचे काहुर लक्ष्मणरावांच्या मनात उठतेय तोच, "मी विठ्ठलराव जोशी. मला स्वामींनी जे सांगितलं, ते मी तुम्हाला देतो." असं म्हणत त्या गृहस्थांनी झटकन तो अनुग्रहाचा कागद लक्ष्मणरावांच्या डोक्यावर ठेवला. ह्या कागदाचा स्पर्श होतोय तोच सारे भान विसरून, लक्ष्मणरावांच्या अंतरंगात आनंदाच्या एवढ्या लहरी एकदम उठल्या की, त्यांना काही समजेनासे झाले. त्यांचा सारा अहंभाव उडाला. माया संपली. इंद्रिय, मन, विषय, द्वेष, सारं - सारं क्षणात संपून एका न संपणाऱ्या आनंदाच्या अमलांत ते बुडून गेले. जीवा-शीवाच्या अखंड न संपू पाहणाऱ्या जबरदस्त अशा त्या भाव-समाधीत ते जवळजवळ ३ तास तल्लीन झाले. त्यातून हळूहळू पूर्ण भानावर आले तेव्हा झालेल्या ह्या अनपेक्षित अनुग्रह कृपेने त्यांचे सर्वांग थरथरत होतं व त्यांच्या नेत्रातून अश्रूधारा वहात होत्या. न थांबणाऱ्या ह्या अखंड अश्रू धारेतच त्यांनी आपल्या न दिसणाऱ्या पण पूर्ण गवसलेल्या गुरूमाऊलीला मनोमन हात जोडले. त्यांना आज अपार आनंद झाला होता, न संपणारा, शब्दात न सांगता येणारा! श्री विठ्ठलरावांकडे ते नंतर सतत जाऊ लागले. स्वामी स्वरुपानंदांची सर्व माहिती त्यांच्याकडून मिळवून, सो ऽहं साधना, ध्यान-धारणा इ. अनेक गोष्टींचे त्यांना ज्ञान झाले. ह्या अनुग्रह कृपेमुळे स्वामींना

बघण्याची, त्यांना भेटण्याची त्यांना उत्कंठा लागली. पण श्री विठ्ठलराव त्यांना म्हणायचे, "तेथे जावून तरी याहून वेगळे तुम्ही काय ऐकणार - त्यापेक्षा सांगितलेली उपासना निष्ठेने करा की मग त्यांच्या प्रेरणेने मीच तुम्हाला त्यांच्याकडे अवश्य घेऊन जाईन."

पुढे लक्ष्मणरावांचा भाचा रत्नागिरीला जाणार होता. त्याला पावसला स्वामींकडे जायला सांगून त्यांनी एक पत्रही स्वामींसाठी दिले. त्या पत्राने स्वामी खूष झाले. त्यांनी त्यांची आस्थेने चौकशी करून, लक्ष्मणरावांसाठी प्रसाद-अंगारा व उत्तराचे पत्रही भाच्याकडे दिले. ही संधी साधून, लक्ष्मणरावांनी मग स्वामींशी थेट पत्र-व्यवहार चालू केला. असे दिवस जाता-जाता एकदा रात्री, लक्ष्मणरावांच्या स्वप्नामध्ये मच्छिंद्रनाथ चौरंगीनाथांसह प्रकट झाले व म्हणाले, "अमलानाथ, खेद कशासाठी करतोस. गुरू-शिष्यांच्या जोड्या आपल्या पंथात अनादी कालापासून चालत आल्या आहेत. या आधीही पूर्व-जन्मात मठ स्थापना करून, तू हा पंथ चालविला आहेस. व पंथाची विजयी-ध्वजा घेऊन, आसेतु-हिमालय फिरलेला आहेस. गुरूभेट झाली नाही म्हणू खेद करू नको. गुरूपदी दृढ हो. ऐक्यरूप होऊनं जा" मग त्यांनी झोळीतून विभू काढली व लक्ष्मणरावांच्या कपाळी लावली व ते म्हणाले– "गुरूची भेट घे - स्वहित साध, आशीर्वाद आहेतच" ह्या स्वप्न दृष्टांतामुळे लक्ष्मणरावांना अपार आनंद झाला. आपण कोण-कुठले याचा त्यांना बोध झाला व स्वामींना भेटण्यासाठी ते पावसला निघाले. तेथे पोहोचल्यावर स्वामींची भेट घ्यायला ते अधीर झाले होते. आतून स्वामींचे बोलावणे येताच ते उत्सुकतेने खोलीत शिरले. सद्‌गुरूंना डोळे भरून पहाता-पहाता, त्यांना एकदम गहिवरून आले नि क्षणात त्यांनी त्यांच्या पायावर मस्तक ठेवले. स्वामींनी मग आपल्या मृदु हातांनी लक्ष्मणरावांच्या खांद्याला धरून त्यांना उठवले व खुणेनेच समोरच्या बाकावर बसायला सांगितले. त्यांची थोडी चौकशी करून, ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांचे पुस्तक त्यांना देऊन, आशीर्वाद मुद्रा दर्शवीत स्वामींनी स्मित केले व खडीसाखरेचा प्रसाद त्यांना दिला. ४/६ दिवस त्यांनी स्वामींच्या सहवासात मजेत घालविले. अनेक प्रश्नांची त्यामुळे उकल झाली.

स्वामी म्हणायचे, आपला सांप्रदाय हा गुरूपादिष्ट मार्ग ज्याची त्याने वाटचाल करून अनुभवावयाचा आहे. 'सो ऽहं' असे श्वासावर अनाहत ध्वनीवर म्हणा. क्षणाक्षणाला "मी तोच आहे" ही धारणा करावयाची. निढळ श्रध्दा व प्रयत्न करून हळूहळू ही वाटचाल करायची."

नंतर लक्ष्मणराव जशी संधी मिळेल, तसे पावसला जावून, स्वामींना भेटत. स्वामींना भेटल्यावर त्यांना अपार आनंद होई. गुरूंच्या सान्निध्यात राहिल्यावर त्यांच्या अनेक कठीण समस्यांची, प्रश्नांची सहज उकल होई. नि ज्ञानाचा घडा हळूहळू भरू लागे. श्री म्हणत, स्वतःच्या मनाला, स्वतःच केलेला उपदेश उत्तम. दुसऱ्याला न बोलता, शिकवता, आपला आपणच बोध घ्यावा, हा सर्वात उत्तम मार्ग! अहंकाराचा त्याग करून, गुरूने सांगितलेल्या मार्गाने श्रध्दा ठेवून, ज्याने-त्याने प्रगती करून

घ्यावी. जेणेकरून स्वात्मानंद व शांती लाभेल.तोच बोध, सदोदित ध्यानी-मनी, स्वप्नी चिंतन करीत असावे. सुख-दु:खे येतील व जातील. साक्षित्वाने सर्वांपासून अलिप्त रहावे.

लक्ष्मणरावांना स्वामी प्रथम 'लक्ष्मणरावजी' म्हणून संबोधित नंतर 'बाबा फडके' म्हणू लागले. त्यांच्या अनेक भाच्यांची पावसला ये-जा सुरू झाल्यावर, 'मामा फडके' हे नाव आले. पण लक्ष्मणरावांना दि. २०/९/७० रोजी लिहिलेल्या पत्रात मात्र श्रींनी त्यांना प्रथमच "अमलानंद" ह्या नावाने लिहिले. लक्ष्मणरावांना पूर्वी चौरंगीनाथांनी प्रत्यक्ष स्वप्नात दृष्टान्त देऊन, 'अमलानंद' ही हाक मारली होती. त्या सांप्रदायिक नावांवर अशारितीने शिक्कामोर्तब झाले. व हेच नाव पुढे सर्वार्थाने रुढ झाले. अमलानंदांना लिहिलेल्या ह्या उद्‌बोधक पत्रात श्री लिहितात, "आत्मयोगाने जो संपन्न आहे, ज्याची वृत्ती आत्मरूपाशी अखंड जडून राहिली आहे, त्याला परमशांतीचा लाभ होतो. अभिमान ज्याचा गळून जातो,त्याची कर्मफळाच्या ठिकाणी हाव तरी कशी रहाणार! अशा प्रकारे ज्यांची सर्व कर्मे सहजपणे होऊ लागली,त्याला परमशांतीचा लाभ होतो. परमशांतीसाठी त्याला कोठे हिंडावे, धुंडावे लागत नाही. परमशांतीच त्याच्या घरी, त्याच्या ठिकाणी प्रवेश करून, त्याला माळ घालते यासाठीच–

"आत्मरूपी दृढ विश्वास
आत्माचि मी हा निदिध्यास।
साक्षित्वे साहोनि सुख-दु:खास
करावा अभ्यास नित्यनेमे।।
आत्मयोगे संपन्न व्हावे
परमशांती म्हणजेच शुध्द आनंद! अमलानंद!"

स्वामींची प्रकृती नाजूक झालेली असल्याने, त्यांना प्रत्यक्षात जास्त बोलता येत नसे.-थोडे-थोडे बोलून ते विश्रांती घेत. मात्र त्यांच्या मोजक्या शब्दातून एवढेच नव्हे तर, टक लावून पहाण्यातूनहि त्यांच्या समोर बसलेल्या अमलानंदांना ज्ञानप्राप्ती होई. दि. १५ ऑगस्ट १९७४ रोजी स्वामींनी देह ठेवल्यावर, अमलानंदांनी त्यांचे नाम-भक्तिचे कार्य पुढे चालू ठेवून, शिष्य-परंपरा नम्रतेने सांभाळली. त्यांना नाद, बिंदू, कला, ज्योती इत्यादी संबंधी सर्व अनुभव येऊन, त्याचे दृढीकरण होऊन, समाधीअवस्थेपर्यंत त्यांची वाटचाल झाली होती. मामांचा स्वभाव सरळमार्गी, बोलण्यात राजकारण नाही, अहंपणा नाही. खुल्या दिलाने अघळ-पघळ बोलण्याने त्यांच्याबद्दल आपोआप आपलेपणा निर्माण होई. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी पेणलाच ठाण मांडले. तेथे येणाऱ्या हजारो भाविकांना नाम वाटून,ध्यानधारणा, 'सो ऽहं' साधना शिकवून, त्यांच्या अडचणी, शंका यांचे निरसन करून त्यांनी साऱ्यांच्याच मनात आदराचे व मानाचे स्थान मिळविले होते. मामांनी विपुल अभंगरचना केली. त्यांचा हेतू स्वात्मसुखाय होता. 'अमलगाथा' हे १०९ अभंगाचे त्यांचे पुस्तक प्रसिध्द आहे.

लहान मुलांवर त्यांची जास्त प्रित! पेणला श्रींच्या प्रथेप्रमाणे दररोज सायंकाळी ७.१५ वाजता मामा बाळगोपाळांसह व उपस्थित साधकांसह श्रीज्ञानेश्वरी नित्यपाठ वाचन, 'सो ऽहं' भजन हा कार्यक्रम नियमित करीत असत. नित्य नियम व 'सो ऽहं' साधनेवर त्यांचा भर होता.

स्वामी स्वरुपानंदांनी आपल्यावर सोपविलेले कार्य, आनंदाने व नम्रतेने करून, मीपणाचा लवलेशही न लागू देता, त्यांनी ही शिष्य-परंपरा व नाथसंप्रदाय साभाळला. व आपले परात्पर सद्‌गुरू श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज, यांचीही आयुष्यभर अखंड सेवा केली. आपल्या वाट्याला आलेले गुरुसेवाव्रत आनंदाने पार पाडून, वयाच्या ८६ व्या वर्षी कृतार्थतेने ते दि. १७/४/८८ रोजी अनंतात विलीन झाले. त्यांच्या दिव्य-पवित्र स्मृतीस माझे शतशः दंडवत!

# श्री साईबाबा

समाधी मंदिरी सिध्देश्वर
द्वारकामाईत योगेश्वर
शिरडीनगरीचे बाबा आहेत परमेश्वर ॥धृ.॥
नसता पोटी संतान बाबांना प्रार्थिती जन
बाबा प्रसन्न होताच संतान पावती जन
बाबा भक्तवत्सल थोर महान
चिंतिती भक्तांचे कल्याण
करिती भक्तांवर कृपावर्षाव अपार ॥१॥ शिरडीनगरीचे –
जो जो भजे बाबांना जैशा जैशा भावे
तैसे तैसे भक्तांसी बाबा पावे
श्रध्दा, सबुरी मनी ठेवावे
साईबाबांना शरण जावे
बाबा करूणेचा नि दयेचा सागर ॥२॥ शिरडीनगरीचे –
शिरडी म्हणजे जशी साईभक्तांची काशी
जेथे साईमूर्ती वसे अविनाशी
भक्तगण जाती दर्शनाशी
झुकविती माथा चरणापाशी
विनविती ठेवा सर्वांवर मायेची पाखर ॥३॥ शिरडीनगरीचे –

**– श्रीमती शकुंतला यशवंत खोले**
घ. नं. ३७३, सोमवार पेठ,
ता. जि. सातारा - ४१५००२.

# साईस्वरुप सद्‌गुरु

– सौ. नीता उल्हास जाधव
६२९, सरेकर- आळी,
महाड, रायगड.

माझे परमपूज्य साईस्वरुप सद्‌गुरू स्वामी अमलानंद यांची ही गोष्ट. मला वाटतं तो दिवस गुरुपौर्णिमेचा होता. त्या दिवशी पेणला स्वामींकडे खूप भक्त गुरुपूजनासाठी येत असतात. दिवसभर विविध पारमार्थिक कार्यक्रम होतात. प्रवचने, नामस्मरण, भजन। जीव अगदी त्यात रंगून जातो. प्रपंचाचे ओझे विसरुन आपण सद्‌गुरुचरणी एकरुप होतो. मन सद्‌गुरुंबोधाचे चिंतन करते, कान सद्‌गुरुंची भजने ऐकतात. डोळे सद्‌गुरुंचे चैतन्य रुप हृदयात साठवून ठेवतात. सद्‌गुरु घरचे प्रसादरुपी अन्न खावून आत्म तृप्त होतो. वाटतं, अगदी अशाच क्षणी हा देह सद्‌गुरुपायी सरुन जावा. उरावा तो फक्त सद्‌गुरुंचा नादब्रह्म. साई सो ऽहं–साई सो ऽहं–साई सो ऽहं साई.

मी स्वामींकडे आले. भक्तांची गर्दी उसळली होती. तेवढ्या गर्दीत माझे डोळे स्वामींना शोधत होते. मी जवळ जावून स्वामींची पाद्यपूजा केली. नमस्कार केला. पाठीवर आशीर्वादाचा हात थोपटला गेला. मुखात स्वामींच्या हातचा पेढा प्रेमाने कोंबला गेला. स्वामी हसत होते. हसता हसता म्हणाले "माझी मास्तरीण आली." स्वामींच्या चेहऱ्यावरचा तो बालीशभाव, दिलखुलास डोळे मिटून हसणे, प्रसन्न हास्यातील ते प्रेमळ कौतुक. स्वतःला अगदी विसरुन जायला होतं. ते मृदूमुलायम कोमल चरण! आपल्या हस्तस्पर्शाने त्यांना वेदना तर होणार नाहीत ना! प्रपंचासाठी राबणारे हात आणि भवभयापासून मुक्त करणारे ते सद्‌गुरुचरण. प्रपंच करता करता परमार्थाची वाट दाखविणारे ते चरण. ज्याने हे घट्ट धरले त्याचा बेडा पार झालाच म्हणून समजा. सर्व दुःख, चिंता हरण करणारे ते शुभ्रतम पवित्र चरणकमल. मी भान हरपून पहात होते. सारा देहच स्वामींच्या पायी अर्पण केला होता. मग माझे मीपण उरलेच कुठे?

मी तिथल्याच एका खांबाजवळ स्वामी सतत डोळ्यांना दिसतील अशी टेकून बसले. श्रीकृष्णाच्या पिवळ्या पितांबरा प्रमाणे फिक्कट पिवळी कफनी घातलेले माझा सद्‌गुरु स्वरुप बाबा गादीवर बसून भक्तांना प्रसन्नपणे आशीर्वाद देत होते. खरं तर वयोमानामुळे भक्तांच्या गर्दीचा त्यांना त्रास होत असावा. पण देहरहित त्यांचा आत्मा या सर्वांपासून मुक्त होता. स्वामींचा देह थकला होता. पण आत्मा तो तर चिरंजीव होता. सदा सद्‌गुरु स्मरणात रत होता. स्वामी असूनही नव्हते आणि होतेही. ब्रह्मानंदी रंगलेला तो पुण्यात्मा. त्याला देहाची काय चिंता! आपणच सद्‌गुरुंना ओळखू शकत नाही. मोह, माया, अहंकार लोभाचे क्षण मनाची दिशाभूल करतात आणि त्यामुळेच आपण नश्वर देहावर प्रेम करु लागतो. देह हा सत्य नव्हे. जे सत्य नाही, ते शाश्वतही नाही. आणि जे शाश्वत नाही त्यापासून आनंद तो काय मिळणार?

सद्गुरुपायी एकरूप झाल्याशिवाय सद्गुरू कळणार नाही. बाबांनी म्हटले आहे, "तुमच्या माझ्या मधील तेलाची भींत दूर करा,म्हणजे तुम्ही आणि मी एकच एक. गुरु शिष्याचे नातेच संपले. गुरुपरता शिष्य नाही. शिष्याशिवाय गुरुपण नाही. मी पहात होते. जडावलेल्या हातांनी स्वामी सर्वांना आशीर्वाद देत होते. टक लावून मी बाबांकडे पहात होते. तेजोमय चैतन्यच जणूं. झळकती सुवर्णाची ओतीव मूर्ती क्षणभर प्रकाशच प्रकाश. त्या सुवर्णमय प्रकाशात बाबांशिवाय मला कोणीही दिसत नव्हते. फक्त माझा साईश्वर साईबाबा. अत्यानंदाने मी डोळे मिटून घेतले. मिटल्या डोळ्यांसमोर सुद्धा ती मूर्ती. जणू ते माझ्या हृदयात विराजमान झाले आहेत. मी दोन्ही हातांनी घट्ट धरून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण हळूहळू मी भानावर आले. अवती भवती भक्तांचा कोलाहल वाढत होता. मी मात्र बाबांना माझ्या नजरेत साठवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. मला फक्त माझे बाबा हवे होते. फक्त माझे बाबा.

तेवढ्यात तीन चार भक्तमंडळी पुढे आली. त्यांनी स्वामींच्या काखेत हात घालून त्यांना हळुवारपणे उठविले. आणि मी भान हरपून पहात राहिले. तेच ते बाबांच्या अखेरच्या जीवनातील दृश्य. आपल्या लाडक्या तात्याचे दुखणे बाबांनी स्वतःवर ओढून घेतले. त्यामुळे बाबा थकले. भक्तांची सारी ओझी स्वतःच्या शिरावर वाहून बाबा थकले होते. बाबा लेंडीबागेत किंवा चावडीकडे जाताना भागोजी शिंद्या, शामा, म्हाळसापती, तात्या वगैरे भक्तगण बाबांना असेच धरुन न्यायचे. अगदी तोच प्रसंग सद्गुरु स्वामींनी मला जसाच्या तसा दाखविला. माझी साईभक्ती दृढ केली. मी पहात होते. बाबांची थकलेली पाऊले हळुवारपणे पडत होती. जणूं पायाखाली एखादा सूक्ष्म जीव जरी आला तरी त्याची हिंसा होवू नये म्हणून बाबा जपत होते. किती कोमल हृदय हे. तेवढेच विशाल. साऱ्या भक्तांची सुख दुःखं जाणून घ्यायला आकाशा एवढेच विशाल हृदय असावे लागते.

स्वामी चालत होते, भक्तांचा आधार घेवून. असेच एकदा बाबा शाम्याला म्हणाले होते, "श्यामा, मला सावर रे बाबा. मी पडेन ना. सावर मला सावर बाबा." खरच का बाबांना त्याची गरज होती. साऱ्या जगाला सावरणारा हा स्वयंभू.माझा देह सावर,असे बाबांनी सांगितले. पण तो कोण सावरणारा? साऱ्या दुनियेला आधार देणारे माझे बाबा त्यांना का इतरांच्या आधाराची गरज होती? पण सारे बाबांचेच कौतुक. भक्तांकडून सारं कौतुकाने करुन घ्यायचे. आणि वर आपणच भक्तांचे कौतुक करायचे. काही गरज नसताना सुद्धा बाबा भागोजी सारख्या महारोग्याकडून हातापायांना तूप चोळून घ्यायचे. चिंध्या कर करुन हातापायांना बांधून घ्यायचे. त्यामुळे झालं काय तर भागोजीच बाबांच्या दिव्य स्पर्शाने व्याधीमुक्त झाला. बाबांची छत्री धरायचे काम भागोजीचे. जर बाबांनीच या महारोग्याला जवळ केल्यावर त्याला दूर तरी कोण लोटणार? जरुर नसताना सुद्धा केवळ भक्तांकडून सेवा व्हावी म्हणून बाबा स्वतःचे अंग, हातपाय भक्तांना दाबावयास सांगत. तिथे स्त्री पुरुष असा भेदच नव्हता. साऱ्या स्त्रिया त्यांना मातेसमान होत्या. शुद्ध मनाने केलेली साईची सेवा कधीच फुकट जात

नसे. ज्या हातांनी बाबांचे पाय दाबले जायचे तेच भक्तांचे थकणारे हात बाबा स्वतःच्या हातांनी दाबून द्यायचे. केवढं भक्तांवरील हे प्रेम. सर्वज्ञ अंतर्ज्ञानी तो त्याला का सारं कळत नव्हतं? पण त्या साईदेवानं मोठेपणा भक्तांना दिला. आपले ओझे भक्तांच्या खांद्यावर टाकले. जाईजुईचे फूल सुध्दा जड असेल. पण अणिमा गणिमा पूर्ण सिध्दी असलेले माझे बाबा फुलाहूनी फूल ते. माझ्या साईची लिलाच अगाध. बाबा पानावर बसले. सगळी जेवली का? बाबा पुन्हा पुन्हा विचारीत होते. वांग्याची भाजी छान झाली हं, असे म्हणून सुगरणींचे कौतुक करीत होते. आवडीने सारे खात होते. दोन्ही परब्रहमचं मग ते तेज काय वर्णावे?

साईंचे ते कौतुक साईमय झाल्याशिवाय कसे समजणार? त्यासाठी हृदयात अपरंपार साईभक्ती हवी. मी पहात होते. भक्तांच्या त्या गर्दीत आपला भार त्या भक्तांच्या खांद्यावर टाकून स्वामी चालत होते, एका हाताने कफनी सावरीत, हळू हळू हळू.

स्वामींना हाताला धरुन त्यांच्या खोलीत विश्रांतीसाठी नेवून ठेवले, जणूं बाबांची द्वारकामाईच. बाबांची अनंत रुपं हृदयात साठवूनच मी घरी परतले. पण माझे मन मात्र स्वामीचरणावरच राहिले होते.

माझ्या सद्गुरुंच्या जीवनातील एक कथा सांगून मी हा लेख पुरा करते. एकदा स्वामी अमलानंद पुण्याच्या बाबा महाराज सहस्त्रबुद्धे या थोर संताला भेटावयास गेले होते. स्वामींना पहाताच ते म्हणाले, बरं झालं तू आलास ते. मी केव्हापासून तुझी वाट पहातोय. हे बघ मी तुझ्यासाठी खिचडी राखून ठेवली आहे. आणि त्यानी आत मोरीवर असलेल्या ॲल्युमिनियमच्या तीन खणी डब्याकडे बोट दाखविले. स्वामींनी यांना नमस्कार केला आणि ते डब्याजवळ गेले. डब्यावर बरीच धूळ साचली होती. या कळकट मळकट डब्याकडे स्वामींनी एकवार पाहिले. आणि डबा उचलून बाबा महाराजांच्या जवळ आणला. त्यांनी डबा उघडल्या बरोबर आमल्याची दुर्गंधी सुटली. खरकटा डबा किती दिवसांचा होता देव जाणे! तिसऱ्या खणात थोडीशी बुरशी आलेली खिचडी होती. स्वामी तिच्याकडे पहातच राहिले. त्याबरोबर महाराज म्हणाले, 'पटकन् खावून टाक. मी तुझ्याचसाठी रे ठेवली आहे. स्वामींनी महाराजांकडे पाहिले. मनात कुठलाही संकल्प विकल्प न आणता ती तार सुटलेली खिचडी खावून टाकली. आणि स्वामी म्हणतात त्या क्षणापासून मी सगळी चवच विसरून गेलो. जिभेचे चोचले त्याक्षणी संपले. कुठल्याही बाबतीत मनात आसक्तीच उरली नाही.

मला आठवते ते बाबांचे भिक्षा मागणे. ताक असो, भाजी असो वा दूध असो. बाबा सारे एकाच पात्रात गोळा करीत. ते अन्न परब्रह्म मिटक्या मारीत खात. स्वतः खात इतरांना घालत. जितेंद्रीय तो. त्याला कसली आली चव वा ढव. पंचपक्वान्ने असोत वा शिळी कांदा भाकरी असो. सारं एकाच भावाने खात रिध्दीसिध्दी ज्याच्या

पायी लोळण घेतात, त्याला भिक्षा मागायची गरज काय? पण मग हे सतत्व जगाला कसे पटणार? केवळ भक्तांच्या सुखासाठीच माझे बाबा जगले. कित्येकांचा उद्धार केला. हाडांची काडे केल्याशिवाय का त्यांना देवपण मिळालं. माझ्या या साईदेवाच्या लीला गाव्या तेवढ्या थोड्याच.

## साईराम आला!

मम गेही साईराम आला,
साईशाम आला, साईराम आला ॥ धृ. ॥
स्मरणी होता हा चिंतीला,
हृदयि होता साठवियेला,
मन्मनी होता हाचि वंदिला,
मम गेही साईराम आला .... ॥ १ ॥
हाचि होता भावे पूजिला,
होता ध्यानी हा पाहिला,
भुलला माझ्या भावभक्तीला,
मम गेही साईराम आला ॥ २ ॥
सदा जागुनी श्रद्धा सबुरीला,
आठवित होतो या देवाला,
आसुसलो मी या दर्शनाला,
मम गेही साईराम आला ॥ ३ ॥
गळा शोभती तुलसीमाला,
सावरीतसे शुभ्र कफनीला,
ब्रह्मानंद हा जणू प्रगटला,
मम गेही साईराम आला ॥ ४ ॥
पाहुनी या सच्चिदानंदाला,
जीव मम आनंदे न्हाला,
भाग्ये मज हा सुदिन गमला,
मम गेही साईराम आला — ॥ ५ ॥
भक्त संकटी हा धावुनि आला,
रक्षितसे मज क्षणाक्षणाला,
अभयदान आम्हा युगायुगाला,
मम गेही साईराम आला — ॥ ६ ॥
ओवाळीन मी जीवेभावे याला,
कोंडुनि ठेवीन हृदयि तयाला,
धन्य असे हा आनंदसोहळा,
मम गेही साईराम आला ..... ॥ ७ ॥

— **श्री. मधुसूदन गोपाळ सावंत,** एम.ए.,बी.एड.
सी—१९, मुलुंड सागरप्रसाद
को. ऑ.हॉ. सोसायटी,
गव्हाणपाडा, गावठाण मार्ग,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.

# साईंची अजबलीला कलश ओतून अंग जरासुध्दा भिजले नाही

– सौ. मंगला सु. वैद्य
द्वारा - श्री. सु. अ. वैद्य
इ/७-१८९ अरेरा कॉलनी,
भोपाळ (म.प्र.)–४६२००१.

पौष महिना, संक्रांतीचा दिवस व पहाटेची वेळ होती. थंडी दुधावरच्या सायीप्रमाणे गावावर पसरली होती. थोड्या वेळाने सारा गाव जागा होऊन आपल्या कामात निमग्न होणार होता. सुवासिनी सडा-संमार्जन करणार होत्या, शेतकरी शेताकडे वळणार होते व वृध्द, श्रध्दाळू जन पूजेअर्चेत मग्न होणार होते. पण ह्या सगळ्याला अवकाश होता. अजून तर गाव उबेत झोपला होता.

अशा वेळी मेघा मात्र जागा होता व गावाच्या बाहेर निघाला होता. त्याच्या हातात एक कलश होता व मनात एक जिद्द. त्याची पावले झपाझप पडत होती आणि निर्जन अंधार मागे पडत होता. आकाशात हलव्याच्या दाण्याप्रमाणे पसरलेल्या चांदण्यांच्याकडे त्याचे लक्ष नव्हते. तो स्वतःच्याच विचारात मग्न होता. गत जीवनातल्या अनेक गोष्टी चित्रपटाप्रमाणे त्याच्या हृदयावर उमटत होत्या व पुसल्या जात होत्या. एक वेळा कसे आपण ब्राह्मण असून धर्मभ्रष्ट झालो, जगाने कशी अवहेलना केली व दादासाहेब साठ्यांनी कसा उध्दार केला, की आपण त्यांना गुरूच समजू लागलो, वगैरे गोष्टी जशाच्या तशा दिसू लागल्या. त्याच गुरूतुल्य साठ्यांनी ेव्हा एका मुसलमान फकीराच्या पायावर डोई ठेवण्यास सांगितल्यावर मनात आलेला विकल्प, व आपण घरी आल्यावर ज्यावेळी ज्वराक्रान्त झालो, त्यावेळी त्याच फकीराचा आपल्याला लागलेला ध्यास सारे जणू पुनः समक्ष घडून येत होते. तो ह्या विचारात असताना प्रकृतिने काळी चन्द्रकळा बदलून लाल गुलाबी व सोनेरी वस्त्र केव्हा परिधान केले, हे त्याला कळलेही नाही. गोदावरीच्या तटावर जाऊन त्याने स्नान केले व कळशी भरून तो परत फिरला. ह्या गंगाजलाने तो शंकरास - साईशंकरास सचैल स्नान घालणार आहे. व संक्रांतिला शंकरास सचैल स्नान घातल्याचे अलौकिक पुण्य व आनन्द मिळविणार आहे.

परत शिर्डीला मशिदीत आल्यावर मात्र तो गप्पच बसला, कारण साईबाबांना भक्तजनांनी गराडा घातला होता आणि आता पुष्कळ वेळपर्यंत नैमित्तिक कामे

परत शिर्डीला मशिदीत आल्यावर मात्र तो गप्पच बसला, कारण साईबाबांना भक्तजनांनी गराडा घातला होता आणि आता पुष्कळ वेळपर्यंत भक्तजनांची वर्दळ चालूच राहणार होती. त्यावेळी मेघाने इतर नित्य नैमित्तिक कामे आटोपून घेतली. इतर ग्रामदेवतांचे पूजन व दर्शन वगैरे करून घेतले. दुपार भरल्यावर जेव्हा बाबा

त्याला मोकळे सापडले, तो त्यांना स्नानासाठी आग्रह करू लागला, सकाळपासून अनेक वेळा स्नानासाठी त्याने हट्ट केला होता पण बाबा भक्त परिवेष्टित असल्याने जास्त काही बोलू शकले नव्हते. साईबाबांनी "फकीरांना कसे गंगाजल व विहीरीचे पाणी एक सारखेच असते" वगैरे अनेक गोष्टी त्याला समजावल्या होत्या. पण त्याने आता खूपच हट्ट धरला होता. "एवढा आग्रह करतोस तर शिरावर थोडे पाणी घाल" असे म्हणून बाबा स्नानाच्या पाटावर जाऊन बसले. मेघाने कलश उचलला व त्याबरोबर असे प्रेम उचंबळून आले की डोक्यावर सबंध घागर ओतून दिली व 'शंकर सचैल न्हावू घातला' ह्या आनंदात डोळे मिटले व डोळे उघडून बघितले तर बघतच राहिला कारण बाबांचे केवळ शिरच ओले झाले होते व सबंध घागर ओतूनही बाबांचे इतर अंग किंवा कपडे ओले झाले नव्हते.हा चमत्कार बघून मेघा विस्मित व सद्‌गदित झाला. त्याने साष्टांग नमस्कार करून डोकं बाबांच्या पायावर ठेवलं. त्याच्या डोळ्यातून वाहणाऱ्या आनंदाच्या व प्रेमाच्या अश्रूंनी बाबांच्या पायावर अभिषेक होऊ लागला. बाबांचा प्रेमळ हात त्याच्या डोक्यावर फिरत होता.

# मनीचा वसा

शिरडी क्षेत्र तीर्थस्थान
भक्त गणांचे पंढरपूर
साई माऊलीचे समाधीस्थान
बाबांच्या चरणी मस्तक हे लीन
महिमा साईंचा वर्णावा किती
थोरवी अनंता एवढी मोठी
सदोदित जपजाप्य साईनामाचे
मुखी द्विगुणीत नित्य व्हावे
हाच मनीचा वसा राहो
हीच आंतरिक ओढ लागो
सद्‌गुरू साईंच्या आशीर्वादाने
ती उत्तरोत्तर फलदायी होवो

**- श्री. अशोक वि. साळसकर**
(वास्तुशास्त्रज्ञ),
९/१, भावेनगर, एम्. आय्. जी.,
कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०.

# उदी... एक संजीवनी

— श्री. गुरुनाथ विष्णू पन्हाळकर
३१२ डी रंकाळावेस, पन्हाळकर वाडा,
कोल्हापूर-४१६ ००२.

हे विसावे शतक सुरू आहे. हे संगणक (कॉम्प्युटर) युग आहे. याला लोक विज्ञान युग म्हणतात. नवे नवे शोध लागत आहेत. मानवाने चंद्रावर पाय ठेवला आहे. निरनिराळ्या रोगांवर औषधांचा शोध लागत आहे. नवी नवी औषधे बाजारात येत आहेत.

परंतु मानव जरी कितीही प्रगत झाला, तरी तो शेवटी संकटकाळी परमेश्वराकडे धाव घेतो. या जगात एक गूढ शक्ती आहे. या जगाचा, विश्वाचा ईश्वर मालक आहे. त्याच्याच कृपेने-इच्छेने हे सर्व जग चालत आहे, सर्व काही घडत आहे, उदा. पाऊस पडणे, झाडाची पाने हलणे वगैरे. देवाने अनेक रूपे धारण केली, तरी शेवटी ईश्वर एकच। हिंदू लोक त्याला राम, मुसलमान रहिम, खिस्त येशू म्हणतात वगैरे कोठल्याही देवाचे नाव घेतले, तरी ते शेवटी ईश्वराला पोहोचते. देव भावाचा भुकेला, भक्तिचा भुकेला. भक्ताने ईश्वराला नामरुपी मारलेली हाक पोचते. जसे जसे आपण नामात दंग व्हाल तसतसे आपण ईश्वराच्या जवळ पोहोचाल असो।

या जगात कोणतीही वस्तू शाश्वत नाही. या जगाचा पण अंत, नाश ठरलेला आहे. कोणताही माणूस अमर नाही. वस्तुची शेवटी राखच होणार. ज्यावेळी माणसाला जाळतात, त्यावेळी शेवटी त्याची राखच होते. त्याला पुरतात, तेव्हा तो मातीशी एकरूप होतो.

पूज संपल्यावर देवापुढे आपण उदबत्ती लावतो. ती पण सगळीकडे वास, सुगंध पसरवीत जळते व शेवटी तिची राख होते. त्या राखेला आपण अंगारा म्हणतो, विभुती म्हणतो. देवाला नमस्कार करुन आपण ती पवित्र भावनेने कपाळाला लावतो, थोडी पोटात घेतो. असे का? याला उत्तर असे की, आपण त्यावर श्रद्धा ठेवून ती लावतो व देवाकडे संकटमुक्तीची प्रार्थना करतो.

गाणगापुरचे भस्म, अक्कलकोटचे गंध, शिर्डीची उदी यांना लोक पवित्र मानतात. या गावांना गेल्यावर ते वरील वस्तू आणतात. बाबांच्या उदीवर भक्तांचा फार विश्वास। सुमारे ६०-६५ वर्षांपूर्वी श्री बाबांनी आपल्या सामर्थ्याने सटका जमिनीवर आपटून त्याच्यापासून विस्तव निर्माण केला. आणि तो विस्तव, ती धुनी आज अव्याहतपणे, अखंडपणे जळत आहे। खरोखरीच ही धुनी म्हणजे आजच्या कलियुगातील एक चमत्कार! याची जी उदी मिळते, तिला भक्त लोक पवित्र मानतात. श्रद्धेने आपल्या घरी नेतात. सर्व रोगांचे, संकटांचे, अडी अडचणींचे निवारण करणारी अशी ही पवित्र उदी! दुसऱ्याला पण देतात. ती उदी, भक्त लोक बाबांचे नामस्मरण करुन कपाळास लावतात, जखमेवर लावतात व तिचा थोड्याच दिवसात भक्तांना गुण येतो.

श्री बाबांच्या वेळी भक्त लोक शिर्डी सोडतेवेळी बापांच्या पाया पडत, त्यांचा निरोप घेत. त्यावेळी त्यांना बाबा उदी देत. जर कोणी भक्त शिर्डीला निघाला व त्याने आपल्या दुसऱ्या भक्तास विचारले की, मी तुझ्याकरता शिर्डीहून येताना काय आणू? बाबांचा फोटो, लाह्या बत्तासे का उदी? तर दुसरा भक्त त्यास प्रथम सांगे की, मला बाबांची पवित्र अशी उदी आणावयास विसरु नकोस! उदीस प्रथम प्राधान्य नंतर बाबांचा फोटो व लाह्या बतासे.

भक्तहो, समजा, जर आपल्याकडची उदी संपली तर काय करावयाचे? उदी दुसरी कोठून आणावयाची? तर त्याला उत्तर असे की, बाबांच्या फोटोपुढे आपण जी उदबत्ती लावतो, त्याचा जो अंगारा खाली पडतो, तो जर बाबांचे नामस्मरण करून लावला आणि प्राशन केला तर त्यास हमखास गुण येणार! कारण, बाबांना आपल्या भक्ताची काळजी आहेच. ते त्याचे रक्षण करणार! बाबांनी असे म्हटले आहे की, "तुम्ही जरी माझे नुसते नामस्मरण केले, तरी मी तुमच्या पाठीशी उभा आहे, मग तुम्ही कोठेही असा!

**"तुमचा मी भार वाहीन सर्वथा**
**नव्हे हे अन्यथा वचन माझे"**

अगर आपण जर आपल्या पायाखालची माती बाबांचे नामस्मरण करून लावली अगर भक्षण केली, तरी बाबा आपल्या मदतीला संकटकाळी धावून येणारच.

परंतु भक्तहो, **"जर मनात नाही भाव, अन् बाबा मला पाव"** अशी वृत्ती उदी घेतेवेळी नको. कारण उदी हे बाबांचे आशीर्वादरूपी भस्म आहे. बाबांपाशी ढोंगीपणा चालत नाही. तशी उदी लावली तर गुण शून्य. जो भक्त रोज सकाळ-संध्याकाळ बाबांचे नामस्मरण करून उदी प्राशन करतो, 'त्याची संकटे, विघ्ने बाबा निवारण करतात. कारण

**"माझा जो जाहला काया वाचा मने**
**तयाचा मी ऋणी सर्वकाळ"**

तेव्हा भक्तहो, बाबांच्यावर श्रध्दा, विश्वास ठेवून त्यांचे रोज नामस्मरण करून उदी प्राशन केली, तर आपली संकटे-विघ्ने बाबा निवारण करणार, कारण भक्तांची बाबांना काळजी आहे. ते त्यांच्या मागे सदैव आहेतच!

तेव्हा, अशी ही बाबांची पवित्र उदी, बाबांनी निर्माण केलेली उदी. भक्तांची संकटे, विघ्ने निवारण करणारी उदी, जणु कलियुगातील एक संजीवनी!

# परमहंस भालचंद्र महाराज

– श्री. प्रभाकर जी. कुबल
मोरजी – वरचा वाडा,
पेडणे – गोवा.

महाराष्ट्राला लाभलेल्या संत मालिकेत श्री परमहंस भालचंद्र महाराज उर्फ नागडे महाराज यांचे स्थान् अढळ आहे. भक्त त्यांना आवडीने बाबा म्हणत. बाबा एक अबोल, विवस्त्र अवधूत म्हणून लोकांना परिचित होते. ते भक्तांच्या अंध:कारमय जीवनातील एक दीपस्तंभ होत!

कोकण भाग तसा निसर्गसौंदर्याने नटलेला! कोकण पाहिलेली कुणीही व्यक्ती या निसर्गपरिसराला विसरू शकणार नाही. या निसर्गमय भूमीने अनेक संतही दिले आहेत. त्यामुळे कोकण भागाला आगळेच रूप प्राप्त झाले आहे.

या कोकण भागात म्हापण गावी (वेंगुर्ला) येथे भक्तिसुगंधाचा वास दरवळणारी एक दैदिप्यमान मूर्ती उदयास आली, ती म्हणजे भालचंद्र उर्फ नागडे महाराज! कोकणभूमीं आपल्या अफाट सामर्थ्याने पावन करणारे भालचंद्र महाराज म्हणजे एक अगम्य शक्तीच जणु! .

सद्‌गुरु श्री साटम महाराज (दापोली) हे त्यांचे गुरु. त्यांच्या वरदहस्ताने त्यांची काया परमेश्वरमय झाली. बाबांचे वडील परम ईश्वरभक्त होते. साहजिकच त्यांना ईश्वर भक्तीचे वेड लागले.

परमेश्वरी लीला अगाध आहे. बाबांच्या लहानपणीच त्यांना माता-पिता दुरावले. त्यात मॅट्रिक नापासाचे अपयश पदरी पडताच त्यांच्या बालमनावर जबरदस्त परिणाम झाला. ते वेड्यासारखे भटकू लागले. स्वत्वाला विसरले. आपण कोण, ही जाणीव त्यांना उरली नाही.

अशा अवस्थेत भटकत भटकत ते कणकवली (सिंधुदुर्ग) या ठिकाणी आले. हा वेडा देवाचा शोध घेऊ लागला.

परमेश्वर भक्ताची सत्त्वपरीक्षा घेऊ लागले. त्या अनोळख्या ठिकाणी त्यांना अनेक दुर्धर प्रसंगांना तोंड द्यावे लागले. केसांच्या जटा, अंगावर वस्त्र नाही. दिगंबर अवस्था! ना खाणे - ना पिणे, ना निवारा. वेडा म्हणून लोक दगड मारीत, अंगावर शेण उडवीत. पण ना खंत, ना दु:ख! नग्न म्हणून लोकांकडून मारहाण सहन करावी लागे. अशा अनेक प्रकारचा छळ सहन करीत, जणु काही घडलेच नाही, अशा अवस्थेत!

सर्वसामान्य माणूस मर्यादेपर्यंत छळ सहन करू शकतो, पण भालचंद्र महाराज त्याही पलिकडे गेले. ते विश्वाच्या पित्याशी एकरूप झाले होते. त्यांच्या मुखकमलावर तेज:पुंज भाव दिसायचे. त्यांनी आपली जागा सोडली नाही. ही अवस्था पाहाताच लोकांच्या मनात शंकारूपी पाल चुकचुकली. हा कुणी वेडा नसून मानवरूपी परमात्मा आहे. थंडी, वारा, पाऊस इत्यादी सहन फक्त परमात्मा करू शकतो. हे सामान्याला अशक्यच!

काम, क्रोध, मोह, लोभ, मत्सर हे त्यांना कधीच शिवू शकले नाहीत. आत्मसुखात दंग झालेल्या संतास इतर कशाचीच जाणीव नसते, ते केवळ निर्भेळ आनंद उपभोगत असतात. बाह्य जगाशी त्यांचा कोणताच संबंध नसतो. माणसासारखा दिसणारा जीवात्मा सदा न् कदा ब्रह्मानंदी टाळी लागलेली असायचा. जणू देहधारण केलेला मुक्तात्माच होय!

महाराजांचा अबोलपणा हा त्याहीपेक्षा श्रेष्ठ! केवळ आपल्या दिव्य दृष्टीने भक्तांना ते सुखावून सोडीत, भक्तांचे मनोरथ पूर्ण करीत.

भालचंद्र बाबांच्या हाताची थप्पड मिळणे, म्हणजे भक्ताला तो कृपाप्रसादच वाटे. न बोलणाऱ्या या सत्पुरूषाचे हजारो भक्तगण आहेत. सारे भक्त बाबांना पाहताच आनंदी होत. आपल्या मौनातून मन तृप्त करीत. दुःखाग्नीनी होरपळून गेलेल्या भक्ताला नेत्रकटाक्षाने सुखाचा घास भरवित.

भालचंद्र महाराज बसलेले असताना कोणी भक्ताने सिगारेट दिली असता ओठावर धरीत. मग भक्त ती पेटवी. बाबा सिगारेट ओढीत असताना त्यावेळी त्यांच्या पाया पडण्यास कोणी आल्यास मानेला, हाताला, सापडेल त्या जागी ते सिगारेटचा चटका देत. त्यांचा हा एक प्रकारचा प्रसादच असे.

भालचंद्र महाराजांनी केलेले चमत्कार तर किती सांगावे. अनेकांना व्याधीमुक्त केले. धगधगीत वैराग्याचं हे वर्णन कोणत्या शब्दात करावे!

महाराजांचा सहवास मला पाच ते सात वर्षे लाभला. सन १९७१ ते १९७७ अखेरपर्यंत मी त्यांना जवळून अनुभवले. माझे काटेरी जीवन आपल्या भक्तीप्रेमाने सुखावले. म्हणून मी त्यांना माझे गुरु मानून आजपर्यंत वागत आहे. संत दर्शन हा अमोल ठेवा, मला त्यांनी मिळवून दिला आहे.

कोण्या संताने म्हटले आहे,

योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी।
पाहता पाहता मना न पुरे धणी।।
देखिला देखिला गे माये देवांचा देवो।
फिटला संदेहो निमाले दुजेपण।।"

अशा थोर संताचे इहलोकी जाणे म्हणजे आम्हा भक्तांना पोरके करून जाणे होय आम्हा हृदयांचा स्वामी गुरूवार दि. १६ डिसेंबर ७७ रोजी आघात करून गेले.

त्यांची प्रेरणा आम्हां सकल जनांचे कल्याण करोत! हीच सदिच्छा!

# साई

– श्री. संजय रा. चव्हाण
१०१/६१, बी. डी. डी. चाळ,
वरळी, मुंबई-१८.

"साई" याचा अर्थ काय? कोणी म्हणतो, स +आई =साई. कोणी म्हणतो, साई म्हणजे सर्वांची आई. एखादा म्हणतो, साई म्हणजे स्वामी. दुसरा म्हणतो, साई म्हणजे महाराज. आपआपल्या मतानुसार व भावनेनुसार सद्‌गुरु साईनाथांच्या पवित्र नामाचे काय वाटेल ते अर्थ लावले जातात. परंतु "साई" या शब्दाचा खरा अर्थ काय? ही बरेच दिवस उत्कंठा होती. बऱ्याच लोकांना विचारले, पण त्यांच्या उत्तराने समाधान झाले नाही.

आणि अचानक त्या साईबाबांच्या कृपेने त्याचा उलगडा झाला, तो असा.

माझ्या वाचनात भगवान श्री. रामकृष्ण परमहंस यांचा चरीत्र ग्रंथ आला, त्यात साई या शब्दाचा खुलासा मिळाला. तो असा की, पूर्वी बंगाल प्रांतात "कर्ताभजा" हा आध्यात्मिक सांप्रदाय होता. सदर सांप्रदायाच्या मतानुसार त्यांच्या अनुयायांची चार वर्गात विभागणी केली जात असे.

१) प्रवर्तक = कीर्तन, प्रवचन, वगैरे करुन समाज जागृती करणाऱ्याला प्रवर्तक म्हणत.

२) साधक = सांप्रदायातील मतानुसार साधना करणाऱ्याला साधक म्हणत.

३) सिद्ध = संपूर्ण साधना करुन सिद्ध झालेल्याला सिद्ध अशी संज्ञा असे.

४) सिद्धातील सिद्ध = अशा अनेक सिद्धांतून पूर्णत्वाला पोहचलेल्या महान पुरुषाला सिद्धातील सिद्ध किंवा "साई" असे म्हणत. भगबान श्री. साईनाथ महाराजांना प्रथम आओ साई म्हणून हाक मारणारे श्री म्हाळसापती हे अधिकारीच व्यक्ती होते याची पूर्ण खात्री पटते.

"श्री. सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय"

# महाभारतातील नीतीकथा

(लेखक – श्री. प्र. ग. सहस्त्रबुद्धे, प्रकाशक श्री. ल. गो. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन, ३० सी खोताची वाडी, गिरगाव, मुंबई ४. पृष्ठे ६४, किंमत ६ रुपये.)

महाभारत हा आम्हा हिंदूंचा एक पुराणप्रसिद्ध पवित्र व बोधप्रद असा ग्रंथ आहे. त्यात कौरव-पांडव युद्ध कथा, ऋषी-मुनींची बोधवचने, त्यांचे पराक्रम इ.चा समावेश आहे. महाभारतातील काही वेचक प्रसंग निवडून त्यावर मुलांच्या दृष्टीने उपयुक्त अशा गोष्टी व त्यातून त्यांनी काय बोध घ्यावा, लक्षात ठेवावे याचे सुरस वर्णन प्रत्येक कथामधून केलेले आहे. गोष्टींना शिर्षकही योग्यच दिलेली असून अधूनमधून काही गोष्टींना अर्थपूर्ण चित्रेही रेखाटलेली आहेत. मुलांच्या हाती अशीच पुस्तके द्यावीत अशी आमची इच्छा शिफारस आहे.

# श्री. बाबा लिमये साईचरणी विलीन

माहिम मुंबई येथील श्रीसाई अध्यात्मिक केंद्राचे संस्थापक व संचालक व सुविख्यात साईसेवक-भक्त श्री. माधव रंगनाथ उर्फ बाबा लिमये एम.ए. यांचे रवि. ता. ७-८-१९८८ रोजी सकाळीच त्यांच्या निवासस्थानी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने अकस्मात् वयाच्या ६६ वर्षी निधन झाले. १९४६ सालापासून त्यांची साईसेवा अखंडपणे चालू होती.

श्री. बाबांचा ज्योतिष व हस्तसामुद्रिकाचा गाढा व्यासंग होता नाट्यकला क्षेत्रातही त्यांनी मौलिक कामगिरी बजावली होती. ते रिझर्व्ह बँकेत विदेशी चलन विभागात अधिकारी म्हणून नोकरीस होते. १९८२ साली ते तिथून सेवानिवृत्त झाले.

श्री बाबांच्या अंत्य समयी विधी घटना मोठी चमत्कारीक होती. पत्नी शैलजाताई एम.ए.एम.एड्. व एकुलते एक चिरंजीव श्री. गुरुदास बी.एसस्सी. ही आदल्याच दिवशी कोणत्याही प्रकारची पुसटशीसुद्धा कल्पना नसल्याने शिरडीस श्रीसाईनाथांच्या दर्शनास रवाना झाली होती. ती तिकडे सकाळी पहिल्या अभिषेकास बसण्याच्या तयारीत असतानाच इकडे श्री. बाबा श्री साईचरणी विलीन झाले होते! आम्ही व शिर्डी श्री साईबाबा संस्थान श्री बाबांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत. श्री साईनाथ महाराज मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत.

# श्री. दाभोलकर यांचे निधन

श्री. विजय दुर्गाराम दाभोलकर, प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यांचे चुलत काका श्री. भालचंद्र गोपालराव दाभोलकर यांचे ११–७–८८ रोजी पहाटे २.३० वा. दादर शिवाजी पार्क येथील त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळामुळे निधन झाले.

श्री. भालचंद्र यांचा जन्म १३ मे १८९९ रोजी अहमदाबाद येथे झाला. त्यांचे वडील कै. गोपालराव रामचंद्र दाभोलकर हे अहमदाबाद येथे प्रख्यात वकील होते. त्यांचेबरोबर श्री. भालचंद्रजी श्री साईनाथांच्या दर्शनास शिर्डी येथे गेले होते. तेव्हा ते १२–१३ वर्षाचे होते. आपल्या आयुष्यातील सर्वात भाग्याचा दिवस, असे बाबांचे दर्शन घेतल्यानंतर ते म्हणत असत. ते प्रसिद्धीविन्मुख होते. निधन समयी त्यांचे वय ९० वर्षाचे होते.

श्री साईनाथ मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवोत.

# शिरडी वृत्त –

## जून ८८

या महिन्यात शिरडीस श्री साईबाबांच्या दर्शनासाठी साईभक्तांची नेहमीप्रमाणे गर्दी होती.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे:–

**कीर्तनः–** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी (गवई) – कीर्तनकार – प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

३) ह. भ. प. राजाराम दिनकर परांजपे, शिरसगांव.

**प्रवचनः–** ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, शिरडी.

**भजन, गायन, वादन, इ.–** १) श्री. गोकुळ मारूती घोडके, पाथरूड २) आरती अंकलीकर टीकेकर, मुंबई. ३) श्री. उदय टीकेकर ४) श्रीमती ज्योती ए. मनुजा, खार ५) श्रीमती रुक्मीणी अम्मीश्वर, बांद्रा ६) सतनाम भजनी मंडळ, सुरत ७) श्री. एम. कृष्णा, हैद्राबाद ८) श्री. सतीश रामचंद्र काळे, नागपूर ९) श्री. माणिक माधवराव श्रीखंडे, गांणगापूर १०) श्री. विजय बाळकृष्ण पाठक, कोल्हापूर ११) श्री. भानुदास ओतारी, कडेगांव १२) श्री. हरीवंश भाटीया, जबलपूर १३) श्री. संजय दत्तात्रय दीक्षित, डोंबिवली १४) श्री. जे. शेषशाई, मद्रास १५) श्री. सिद्धी विनायक भजनी मंडळ, पुणे १६) श्री. नरेश लक्ष्मण सोमण, नागपूर १७) श्री. गोविंदभाई बी. रावल, बडोदे.

## जुलै ८८

या महिन्यात श्री साईबाबांच्या दर्शनासाठी साईभक्तांची तसेच पंढरपूरला जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा साईभक्तांची खूप गर्दी झाली होती. या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सव गुरुवार दि. २८-७-८८ ते शनिवार दि. ३०-७-८८ पर्यंत समाधी मंदिरात मोठ्या थाटाने साजरा झाला. नामांकित कलाकार श्री. श्रीनिवास खळे, श्री. सुरेश वाडकर, श्री. जयवंत कुलकर्णी, श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे, श्री. वासुदेव भगवान उत्पात, लावणी मंडळ, पंढरपूर वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. ह.भ.प. माधवराव आजेगांवकर, परभणी यांचे कीर्तन झाले.

**गुरुपौर्णिमा उत्सव – पहिला दिवस :–**

गुरुवार दि. २८-७-८८ रोजी मंदिर पहाटे ५ वाजता उघडले. ५.१५ वा. काकड आरती झाली. सकाळ ६ वा. "श्रीं"च्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्री साईसच्चरित्र अध्याय वाचनास सुरुवात झाली. श्रीं चे स्नान, अभिषेक पूजा, आरती झाल्यानंतर

दुपारी ४.३० ते ६.४५ पर्यंत ह.भ.प. श्री. माधवराव आजेगांवकर, परभणी यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्रौ ७.३० ते ९.०० व ९.३० ते ११.०० पर्यंत श्री. श्रीनिवास खळे व श्री. सुरेश वाडकर, मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ ९.१५ वा. श्रींच्या पालखीची गावातून मिरवणूक निघाली. पालखीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रात्रौ ११ वाजता श्री च्या पालखीची मिरवणूक गावातून फिरुन आल्यानंतर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :-**

शुक्रवार दि. २९-७-८८ रोजी पहाटे ५ वाजता मंदिर उघडले. उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने साईभक्तांची गर्दी बरीच होती. ५.१५ वाजता काकडआरती सुरु झाली. ६ वाजता "श्रीं"च्या फोटोची व पोथीची अध्यायवाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधी मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४.३० ते ६.४५ पर्यंत ह.भ.प. माधवराव आजेगांवकर, परभणी यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७.३० वाजता धुपारती झाल्यानंतर रात्रौ ९.१५ वा. श्रीं च्या रथाची मिरवणूक समाधी मंदिरातून वाद्यांचे गजरात निघाली. सनई, चौघडा, टाळ, मृदुंग, गायन, भजन, राहता बॅन्ड पथक, कोपरगांव, झांज नगारा, पुणे येथील मयूर बॅन्ड व न्यू गंधर्व बॅन्ड पथक, डफ, ढोल अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजिक आला. त्या ठिकाणी संस्थान कर्मचारी, साईभक्त, व ग्रामस्थ लोक यांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. भारुड गारुड कार्यक्रमात सर्वश्री तुकाराम परदेशी, एकनाथ पाटील कोते यांनी भाग घेतला. पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर, सिने कलाकार यांनी नकला कार्यक्रम केले. त्यानंतर रात्री २.०० वाजता रथ मिरवणूक समाधी मंदिरात आली. मिरवणूकीतील भक्त कलाकारांच्या कार्यक्रमात सामिल झाले. साईभक्तांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा सांगता दिन :** शनिवार दि. ३०.७.८८ रोजी सकाळी ६.०० वा. श्रींचे मंगलस्नान झाले. ७.३० ते ८.३० पर्यंत गुरुस्थान येथे रुद्राभिषेक झाला. १०.३० ते १२.३० पर्यंत ह.भ.प. माधवराव आजेगांवकर, परभणी यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यानंतर माध्यान्ह आरती झाली व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७.३० ते ९.४५ पर्यन्त श्री. वासुदेव भगवान उत्पात, लावणी मंडळ, पंढरपूर यांचा "लावणीतील भक्ती दर्शन" हा कार्यक्रम झाला. त्यानंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे :-

**कीर्तन :** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी, गवई – कीर्तनकार – प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. श्री. माधवराव आजेगांवकर, परभणी.

३) ह.भ.प. प्रल्हाद गणेश पाठक गुरुजी, नासिक.

**प्रवचन :** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, शिरडी.

**भजन, गायन, वादन इ. :–**

१) श्री. श्रीनिवास खळे, मुंबई २) श्री. सुरेश वाडकर, मुंबई ३) श्री. सत्यशिल देशपांडे ४) श्री. शंकर महादेवन ५) कु. क्षमा खळे ६) कु. संजीवनी खळे ७) श्री. अविनाश आहेर ८) श्री. सोमनाथ परब ९) श्री. अनंत पांचाळ १०) श्री. आप्पा सामंत ११) श्री. राजेश प्रधान १२) श्रीमती कमलिनी विजयकर १३) कु. सुचित्रा बरवे १४) कु. अनील शशिकांत कुलकर्णी, शिरडी १५) चारुशिला शशिकांत कुलकर्णी १६) कु. योगिता काशिनाथ रसाळ १७) श्री. सुधीर संभाजी सावंत १८) श्री. रंगनाथ बारकू कानडे, कोपरगांव १९) कु. जयमाला मेहर, मुंबई २०) कु. विनायक दिलीप तापडीया २१) पारस पोरवाल, शिरडी २२) श्री. विश्वनाथ सदाशिव चव्हाण २३) कु. अविनाश खेडकर, पुणे २४) कु. शंकर माधव आजेगांवकर २५) श्री. तुकाराम माधवराव दैठणकर. २६) श्री. राजकुमार रासक २७) श्री. नारायण द. राहूरकर २८) आ. मा. दैठणकर २९) सौ. मनी अय्यर, मुंब ३०) श्री. चंद्रकांत डोईफोडे ३१) श्री. दौलत भाई शर्मा, मुंबई ३२) श्री. विठ्ठल क्षिरसागर, पुणे ३३) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी ३४) श्री. भोलानाथ समेळ, मुंब ३५) श्री. प्राणेश बाळासाहेब कुलकर्णी ३६) श्री. सुरेश धुमाळ आणि पार्टी ३७) श्री गणपत बाळाजी जाधव ३८) श्री. उदय बाईत ३९) श्री. विजय मालवणकर ४०) श्री. मनोहर घडसे ४१) श्री. गजानन कामटेंकर ४२) श्री. दिलीप सावंत ४३) श्री. धनंजय उईके ४४) श्री. किशोर पवार ४५) श्री अविनाश साळवी, मुंबई ४६) श्री. जयवंत कुलकर्णी व पार्टी, मुंबई ४७) श्री. अरविंद म्हात्रे ४८) श्री. मनोहर कदम ४९) श्री. नाना विध्वांस ५०) श्री. चंद्रकांत नाचने ५१) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, पुणे ५२) श्री. मिलिंद मोहिते, परळ ५३) श्री. रघुनाथ सांडभोर ५४) सौ. रेखा मडावी व पार्टी, अहमदनगर ५५) श्री. अनंत पांचाळ व पार्टी, मुंबई ५६) कविता मडावी, नगर ५७) श्री. चंद्रकांत बाईत ५८) श्री. उदय बाईत ५९) श्री अनिल बाईत ६०) श्री. विजय मालवणकर ६१) व्ही. श्रीकांत ६२) कु. कमलेश पांचाळ ६३) कु. संकेत सुर्वे ६४) कु. वनिता गवस ६५) कु. स्वाती सुर्वे ६६) कु. प्रमोदिनी बाईत ६७) श्री. रामकृष्ण बाईत ६८) श्री. दामोदर भोगले ६९) श्री. संजय घाडी ७०) श्री. चंद्रशेखर जाधव, कर्नाटक ७१) श्री. सुभाष पोरवाल ७२) श्री प्रकाश खैरमोडे ७३) श्री. रत्नाकर नाना कोराटे, शिरडी ७४) श्री. राजकुमार बार्शीकर, पुणे ७५) श्री. मधुकर मोहन उपासनी ७६) श्री. नितीन शांताराम मिराणे शिरडी ७७) श्री. ईब्राहीम बाबू उजावल ७८) श्री. भिमराज बनसोडे, साकुरी ७९) श्री. अशोक राजाराम परब ८०) सौ. रोहिणी जहागिरदार ८१) श्री. नानासाहेब कोराटे, शिरडी ८२) श्री. नटवरलाल विसपुते, शिरडी ८३) श्री. नामदेव गणपत शिंदे ८४) श्री. अरुण सोमाणी, संगमनेर ८५) श्री. सखाराम राधुजी गुरव

कोपरगांव ८६) श्री. राममास्तर मांगरूळकर ८७) श्री. सीरसुल पी. आर. ८८) श्री. प्रकाश बेर्डे ८९) श्री. नंदू लोढा ९०) श्री. संदीप लाहोटी ९१) श्री. शाम भंडारी ९२) श्री. शिवराम बिडवे ९३) श्री. भगवान खंडागळे ९४) श्री. केशव बिडवे ९५) श्री. अनिल राठी ९६) अ. प्रकाश सोमाणी ९७) श्री. सुधाकर बोराडे ९८) श्री. अशोक पवार ९९) श्री. राजा भंडारी १००) श्री. निलेश मुटके १०१) श्री. शंकर गाढे १०२) श्री. अर्जुन आमले १०३) पी. डी. इंगळे १०४) श्री. शैलेंद्र देशपांडे १०५) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती १०६) कुमार कुलकर्णी १०७) बालमभाई पापांभाई बॅन्ड, राहाता १०८) श्री. साहेबराव सोपान वदक, शिरडी १०९) श्री. सदाशिव जाधव ११०) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी १११) श्री. नितीन कुमठेकर ११२) श्री. राजाराम रंगनाथ देशपांडे ११३) श्री. अशोक आढाव ११४) श्री. बाळासोहब कुलकर्णी ११५) श्री. महादेव तुकाराम तुपे ११६) श्री. छगनराव बिडवे ११७) श्री. प्रकाश राऊत, अहमदनगर ११८) श्री. भरत तुळशीराम पारखे ११९) श्री. रंगनाथ रासकर १२०) श्री. प्रकाश सूर्यकांत हुडे १२१) श्री. रमेश नारायण नीचळ १२२) श्री. कल्याणकर, कल्याण १२३) श्री. राजेश रंगनाथ रासकर १२४) श्री. आप्पासाहेब डोंगरे १२५) श्री. मधुकर सोनवणे १२६) श्री. दत्तात्रय भोसले १२७) श्री. आप्पा सामंत १२८) श्री. ज्ञानोबा ज. पुणेकर, पुणे १२९) श्री. जयंत नगरकर, पुणे १३०) श्री. रामकृष्ण सालकर, कोपरगांव १३१) श्री. गंगाधर जाधव, पुणे १३२) श्री. सतीश नागेशराव, मुंबई १३३) श्री. रमेशभाई साहेब, खार १३४) श्री. सुरेश राजाराम आंजर्लेकर १३५) श्री. बारकूशेठ गुणाजी मांडवकर १३६) श्री. शशिकांत एकनाथ दळवी १३७) श्री. विलास पावसकर १३८) श्री. वसंत बाळाराम जोशी १३९) श्री. विलास राजाराम महाडीक १४०) श्री. सुभाष ज. कांबळी १४१) श्री. सुनिल परशुराम साळवी १४२) व्ही. रामदांस, मुंबई १४३) न्यू गंधर्व ब्रास बॅन्ड, पुणे १४४) सय्यदबाबा ढोलीबाजा, राहाता १४५) मयूर बॅन्ड पथक, पुणे १४६) सौ. अनुराधा पिंपळगांवकर, पुणे १४७) सौ. शालीनीबाई मोहनराव आंबोडकर, साकरवाडी १४८) श्री. जी. एम. माळीवाडकर, साकरवाडी १४९) श्री. हिरुभाई पटेल, साकरवाडी १५०) श्री. मोहनराव आंबोडकर, साकरवाडी १५१) एस. एस. वाघ १५२) श्री. एस. एस. कोटस्थाने सर, शिरडी १५३) पी. आर. यादव १५४) व्ही. ए. पाटील, शिरडी १५५) श्री. विवेक मुळे, मुंबई १५६) श्री. रघुनाथ नागरे, शिरडी १५७) श्री. महेश सावर्डेकर, मुंबई १५८) श्री. ओंकार विलास परळकर, मुंबई १५९) श्री. पदीप गिरप, मुंबई १६०) श्री. गोरक्षकर साहेब १६१) श्री. बांदेकर १६२) ह.भ.प. माधवराव आजेगांवकर १६३) श्री. चंद्रकांतराव डोईफोडे १६४) श्री. गिरीष सातवनकर १६५) श्री. प्रभाकर आजेगांवकर १६६) श्री. चतुर्धनशेठ नागरे, शिरडी १६७) श्री. बारावकर काका, शिरडी १६८) श्री. माणिक साळी, शिरडी १६९) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव १७०) श्री. शांताराम मिराणे १७१) श्री. पवार, शिरडी १७२) श्री. नंदू चव्हाण १७३) श्री. वासुदेव भगवान उत्पात १७४) श्री. ज्ञानोबा उत्पात, पंढरपूर, १७५)

श्री. बाबाजी उत्पात १७६) बा. ना. उत्पात १७७) श्री. सुरेश उत्पात १७८) श्री. तात्याराव मंगळवेढेकर १७९) श्री. नरसिंग मंगळवेढेकर १८०) श्री. गोविंद वनाटे १८१) श्री. शंकरराव मंगळवेढेकर १८२) श्री. चंद्रकांत डोईफोडे १८३) श्री. माधवराव आजेगांवकर १८४) श्री. बाळ अनवलीकर १८५) श्री. प्रदीप रातने

१८६) श्री. आर गणेश, प. बंगाल १८७) श्री. वसंत गोपीनाथ काळोखे, शिरडी १८८) श्री. विष्णुदयाळ बाबा, शिरडी १८९) श्री. ए. सी. के. सरदारजी सॉईया, दिल्ली १९०) श्री. बी. सत्यनारायण, बंगलोर १९१) श्री. मुक्तेश्वर पलोगुडा १९२) श्री. मुन्शीलाल, शिरडी १९३) श्रीमती वेदावती, हैद्राबाद १९४) एम. रामैय्या, काझीपेठ १९५) आर. ईश्वरदास, सिकंदराबाद १९६) शाहीर कुमार कुलकर्णी, अहमदननगर १९७) श्री. मनोहर दत्तात्रय अवचट, बारामती १९८) सुनंदा दादा पाटील, सडोली १९९) श्री. मिलिंद करकरे, इंदौर २००) श्री. चिदानंद सिदाम जाधव, सोलापूर २०१) श्री. दत्ता सिताराम जाधव २०२) श्री. प्रकाश रामचंद भैरी २०३) श्री. व्यंकट दत्ता माने २०४) श्री. भालचंद्र पवार २०५) श्री. सूर्यभान बापुराव नागभिडे, परभणी २०६) श्री. शंकर गुरुलिंग वसेकर २०७) सर्वोत्तम सोडवालकर २०८) श्री. सुरेश सोनार एवम् राजू कुलपारे, इंदौर २०९) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुंबई २१०) श्री. प्रदीप शांभूर पंडीत २११) श्री. हिरालाल एस. पंडीत २१२) श्री. देवराव कृष्णजी वेले, मोरशी २१३) श्री. सूर्यप्रकाश श्रीवास्तव, मुंबई २१४) सौ. जयंती सुब्रमण्यम, हैद्राबाद २१५) सौ. विजयालक्ष्मी, हैद्राबाद २१६) आरती थिएटर्स, मुंबई प्रस्तुत म्युझिकल होरायझन्स संजय पुणतांबेकर व पुढील तेवीस कलाकार २१७) श्री. अरविंद म्हसाने २१८) श्री. दिनेश पडाया २१९) श्री. दिलीप जगळे २२०) श्री. राजन कुलकर्णी २२१) चंचल चौधरी २२२) श्री. राघवेंद्र अंकलगी २२३) वंदन गरुड २२४) श्री. शैलेश पवित्रन २२५) श्री. महेंद्र जगळे २२६) श्री. विजय सोनवणे २२७) श्री. निनाद देवधरे २२८) श्री. राजू शिंदे २२९) सौ. कांताजी पाखरे २३०) श्री. देवराज उनवणे २३१) श्री. सय्यद हनीफ २३२) श्री. सुनिल चुंबळे २३३) श्री. कुमारसेन गुप्ते २३४) श्री. पाथरे २३५) श्री. अब्दुल २३६) श्री. शाईल २३७) श्री. राजकुमार पगारे २३८) श्री. रमेश पवार २३९) श्री. ज्ञानोबा यादवराव सोनवणे २४०) कु. प्राणेश बाळासाहेब कुलकर्णी, सावळीविहीर २४१) श्री. तुकाराम माधवराव दैठणकर, पुणे २४२) श्री. दत्ता दगडोबा राहूरकर, पुणे २४३) श्री. रमाशंकर तिवारी, मुंबई २४४) श्री. राकेश रायजादा, भोपाळ २४५) श्री. यादव तुळशीराम आढाव २४६) श्री. दामू आण्णा दळवी, श्रीरामपूर २४७) व्ही. व्यंकटेश्वर, विजयवाडा.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |